पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
मा.महापालिका सभा
कार्यपत्रिका क्रमांक - ३७
सभावृत्तांत

दिनांक :- १८.९.२००९ वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे सप्टेंबर-२००९ ची मासीक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक १८.९.२००९ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.अपर्णा निलेश डोके महापौर
२. मा.बो-हाडे शरद परशुराम उपमहापौर
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा
४. मा.जाधव विजया अशोक (मामी)
५. मा.आल्हाट शांता महेंद्र
६. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे
७. मा.सौ. बढे सुलोचना बबन
८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
९. मा.महेश किसन लांडगे
१०. मा.फुगे सुनंदाताई विजय
११. मा.आशा अंकुश लांडगे
१२. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी
१३. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर
१४. मा.डॉ.वैशालीताई घोडेकर
१५. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले
१६. मा.कदम निर्मला सदगुरु
१७. मा.गुंजेकर स्मिता रमेश

१८. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

१९. मा.काळूराम मारुती पवार

२०. मा.आझम फकीरभाई पानसरे

२१. मा. चांदगुडे महेश गंगाराम

२२. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

२३. मा.भापकर मारुती साहेबराव

२४. मा.शेट्टी जगदिश

२५. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२६. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२७. मा.उबाळे वैशाली संजय

२८. मा.जावेद शेख

२९. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

३०. मा.भोंडवे तुकाराम महादू

३१. मा.खानोलकर मनोज विक्रम

३२. मा.गणेश तुकाराम भोंडवे

३३. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

३४. मा.वाघ रघुनाथ दलपत

३५. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

३६. मा.गावडे जयश्री वसंत

३७. मा.साबळे जगन्नाथ दगडू

३८. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी

३९. मा.आसवानी डब्बु

४०. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

४१. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

४२. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

४३. मा.भाऊ उर्फ कैलास गबाजी थोपटे

४४. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

४५. मा.भारती ज्योती सुखलाल

४६. मा.कोकणे संतोष अंकुश

४७. मा.दरेकर सतीश दगडू

४८. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

४९. मा.अशोकभाई सोनवणे

५०. मा.एकनाथ मोटे

५१. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

५२. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

५३. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

५४. मा.यशवंत भोसले

५५. मा.कुटे गोपाळ नाना

५६. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

५७. मा. विनायक सुरेश रणसुभे

याशिवाय मा.आशिष शर्मा-आयुक्त, मा.गायकवाड-सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव,मा.लोंढे-मुख्यलेखापाल,मा.जाधव-शिक्षणाधिकारी(माध्य.) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,आयुक्त,अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.ज्ञानेश्वर भालेराव :- मा.महापौर साहेब, ख्यातनाम सहकारमहर्षि व माजी मंत्री -यशवंतराव मोहिते, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री-वाय.एस.राजशेखर रेड्डी, हरितक्रांतीचे जनक आणि नोबल पुरस्कार विजेते जागतिक कृषिशास्त्रज्ञ-नॉर्मन बोरलॉग, विख्यात क्रिकेटपटू ते क्रिकेट प्रशासक व भारतीय क्रिकेट बोर्डाचे माजी अध्यक्ष-राजसिंग डुंगरपूर, पिंपरी-चिंचवड नगरपालिकेचे माजी नगरसेवक व ज्येष्ठ क्रीडा तज्ज्ञ-बापू गावडे, सेवा विकास बँकेचे माजी उपाध्यक्ष व नगरपालिकेचे माजी उपाध्यक्ष चेतनदास मेवाणी यांचे पुत्र-महेश चेतनदास मेवाणी, बुध्दिबळ महर्षि-नरहर व्यंकटेश तथा भाऊसाहेब पडसलगीकर, दलित

रंगभूमीचे संस्थापक, ज्येष्ठ नाटककार व साहित्यिक-भिं.शिं.शिंदे, विख्यात हार्मोनियमवादक व संगीतज्ज्ञ-अप्पा जळगांवकर, पी.एम.पी.एम.एल.कर्मचारी - प्रमोद बाळकृष्ण कदम, सांगवी-तुकाराम टेके, यल्लप्पा शेटी मंजाळ, काशिनाथ महादेव वरपे, मनपा कर्मचारी श्री.मोरे यांचे वडील-शंकर बालाजी मोरे, अब्दुला शेख यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून सभा तहकुब करणेत यावी.

मा.तानाजी खाडे :- अनुमोदन देतो.

मा.महापौर :- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(उपस्थितांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली)

-------

मा.महापौर :- उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या संमतीप्रमाणे मंगळवार दि.३.११.२००९ रोजी दुपारी २.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( अपर्णा निलेश डोके )
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
मा.महापालिका सभा
कार्यपत्रिका क्रमांक - ३७
सभावृत्तांत
(दि. १८.९.२००९ ची तहकूब सभा )

दिनांक :- ३.११.२००९ वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि. १८.९.२००९ ची तहकूब मा.महापालिका सभा मंगळवार दिनांक ३.११.२००९ रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.अपर्णा निलेश डोके महापौर
२. मा.बो-हाडे शरद परशुराम उपमहापौर
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा
४. मा.जाधव विजया अशोक (मामी)
५. मा.दत्तात्रय बाबुराव साने
६. मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव
७. मा.लोखंडे सुजाता सुनिल
८. मा.आल्हाट शांता महेंद्र
९. मा.डॉ.सौ.मीना पाटील
१०. मा.खेडकर घनशाम रामचंद्र
११. मा.कुंभार रामदास तानाजी
१२. मा.सौ. बढे सुलोचना बबन
१३. मा.अजित दामोदर गव्हाणे
१४. मा.महेश किसन लांडगे
१५. मा.फुगे सुनंदाताई विजय
१६. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

१७. मा.डॉ.वैशालीताई  घोडेकर

१८. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

१९. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

२०. मा.बहल योगेश मंगलसेन

२१. मा.कदम निर्मला सदगुरु

२२. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश

२३. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

२४. मा.काळूराम मारुती पवार

२५. मा. चांदगुडे महेश गंगाराम

२६. मा.भापकर मारुती साहेबराव

२७. मा.शेट्टी जगदिश

२८. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

२९. मा.बोबडे  भिमा  सखाराम

३०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

३१. मा.गवळी शशीकिरण

३२. मा.तानाजी विठ्ठल खाडे

३३. मा.उबाळे  वैशाली  संजय

३४. मा.सुमनताई  मधुकर पवळे

३५. मा.कुमार आर. एस.

३६. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

३७. मा.कुटे गोपाळ नाना

३८. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

३९. मा.भोंडवे तुकाराम महादू

४०. मा.खानोलकर मनोज विक्रम

४१. मा.गणेश तुकाराम भोंडवे

४२. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

४३. मा.वाघ रघुनाथ दलपत

४४. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

४५. मा.आण्णा दादू बनसोडे

४६. मा.तिकोने हरिभाऊ किसन

४७. मा.बाराहाते शरद भगवंतराव

४८. मा.साबळे  जगन्नाथ दगडू

४९. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी

५०. मा.आसवानी डब्बु

५१. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

५२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

५३. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

५४. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

५५. मा.भाऊ  उर्फ  कैलास गबाजी थोपटे

५६. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

५७. मा.भारती ज्योती सुखलाल

५८. मा.कोकणे संतोष अंकुश

५९. मा.सुतार विजया विजय

६०. मा.दरेकर सतीश दगडू

६१. मा.बारणे संतोष नागु

६२. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

६३. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग

६४. मा.सौ. नांदगुडे सुजाता विलास

६५. मा.खोमणे लता हनुमंत

६६. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर

६७. मा.साळुंखे सुरेखा मारुती

६८. मा.जगताप शंकर पांडुरंग

६९. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

७०. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

७१. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

७२. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

७३. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

७४. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

७५. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे

७६. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

याशिवाय मा.आशिष शर्मा-आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख, मा.जोशी-सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.सुरगूडे-विकास अभियंता मा.दुधेकर-कार्यकारी अभियंता, मा.जाधव-शिक्षणाधिकारी(माध्य.), मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,आयुक्त,अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे **:-** मा.महापौर साहेब, जुन्या पिढीतील ज्येष्ठ कादंबरीकार-बाबा कदम, विख्यात खोखोपटू व खोखोचे ज्येष्ठ प्रशिक्षक- गोपाळराव फडके, ज्येष्ठ नाट्यचित्र अभिनेते-चित्तरंजन कोल्हटकर, जुन्या काळातील ज्येष्ठ अभिनेत्री-सुमती गुप्ते, महापालिकेतील कर्मचारी प्रकाश बने यांचे वडिल-शांताराम धोंडू बने, रुपीनगर- सौ.सुलोचना गरुड, जानराव निस्ताने,
सुरेश पोटघन यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून सभा तहकुब करणेत यावी.

मा.भिमा बोबडे :- अनुमोदन देतो.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, आचारसंहिता झालेली आहे अनेक दिवस सभागृहाचे कामकाज झालेले नाही. स्वाईन फ्ल्यूचा प्रादूर्भाव वाढतो आहे,रुग्णांची संख्या वाढते आहे त्याचप्रमाणे पाण्याचा सुध्दा प्रश्न आहे. शहरामध्ये काही भागात कमी प्रमाणात पाणीपुरवठा होतो तर काही भागामध्ये प्रेशरने पाणी मिळते. प्रत्येक वेळी आपण श्रध्दांजली वाहतो सभा तहकूब करतो.

मृत व्यक्तिच्या कुटूंबियाचा आदर राखून मी असे सांगतो की दहा मिनिटासाठी सभा तहकूब करुन सभेचे कामकाज उरकावे.

मा.महापौर :- सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(उपस्थितांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली)

-------

मा.महापौर :- उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या संमतीप्रमाणे शनिवार दि.१९.१२.२००९ रोजी दुपारी ३.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( अपर्णा निलेश डोके )
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

## मा.महापालिका सभा

## कार्यपत्रिका क्रमांक - ३७

## <u>सभावृत्तांत</u>

(दि. १८.९.२००९ व ३.११.२००९ ची तहकूब सभा )

<u>दिनांक :- १९.१२.२००९</u>  <u>वेळ :- दुपारी ३.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.३.११.२००९ ची तहकूब मा.महापालिका सभा शनिवार दिनांक १९.१२.२००९ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.बहल योगेश मंगलसेन | महापौर |
| २. | मा.आसवानी डब्बु | उपमहापौर |
| ३. | मा.भालेकर शांताराम कोंडीबा | |
| ४. | मा. घुले रघुनंदन रामभाऊ | |
| ५. | मा.थोरात एकनाथ दादा | |
| ६. | मा.दत्तात्रय बाबुराव साने | |
| ७. | मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव | |
| ८. | मा.लोखंडे सुजाता सुनिल | |
| ९. | मा.बो-हाडे शरद परशुराम | |
| १०. | मा.आल्हाट शांता महेंद्र | |
| ११. | मा.डॉ. सौ. मीना पाटील | |
| १२. | मा.खेडकर घनशाम रामचंद्र | |
| १३. | मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे | |
| १४. | मा.सौ. बढे सुलोचना बबन | |

१५. मा.गवळी विजया पंडित

१६. मा.महेश किसन लांडगे

१७. मा.फुगे सुनंदाताई विजय

१८. मा.आशा अंकुश लांडगे

१९. मा.मोहिनी विलास लांडे

२०. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२१. मा.सावळे सिमा

२२. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२३. मा.डॉ.वैशालीताई घोडेकर

२४. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२५. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

२६. मा.कदम निर्मला सदगुरु

२७. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश

२८. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

२९. मा.काळूराम मारुती पवार

३०. मा.आझम फकीरभाई पानसरे

३१. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३२. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३३. मा.भापकर मारुती साहेबराव

३४. मा.शेट्टी जगदिश

३५. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

३६. मा.बोबडे भिमा सखाराम

३७. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

३८. मा.गवळी शशीकिरण

३९. मा.तानाजी विठ्ठल खाडे

४०. मा.उबाळे वैशाली संजय

४१. मा.सुमनताई  मधुकर पवळे

४२. मा.कुमार आर. एस.

४३. मा.उल्हास शेट्टी

४४. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

४५. मा.कुटे गोपाळ नाना

४६. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

४७. मा.भोंडवे तुकाराम महादू

४८. मा.गणेश तुकाराम भोंडवे

४९. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५०. मा.वाघ रघुनाथ दलपत

५१. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

५२. मा.तिकोने हरिभाऊ किसन

५३. मा.बाराहाते शरद भगवंतराव

५४. मा.गावडे  जयश्री वसंत

५५. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी

५६. मा.रामआधार धारिया

५७. मा. ॲड. अमर साधूराम मुलचंदानी

५८. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

५९. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

६०. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

६१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

६२. मा.भाऊ उर्फ  कैलास गबाजी थोपटे

६३. मा.भारती ज्योती सुखलाल

६४. मा.सुतार विजया विजय

६५. मा.दरेकर सतीश दगडू
६६. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार
६७. मा.बारणे संतोष नागु
६८. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब
६९. मा.कलाटे कमल तानाजी
७०. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग
७१. मा.खोमणे लता हनुमंत
७२. मा.प्रशांत शितोळे
७३. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर
७४. मा.अशोकभाई सोनवणे
७५. मा.जगताप शंकर पांडुरंग
७६. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
७७. मा.एकनाथ मोटे
७८. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद
७९. मा.गायकवाड सुरदास तुकाराम
८०. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
८१. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ
८२. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ
८३. मा.कुंभार रामदास तानाजी
८४. मा.अजित दामोदर गव्हाणे
८५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे
८६. मा.अपर्णा निलेश डोके
८७. मा.साबळे जगन्नाथ दगडू
८८. मा.कोकणे संतोष अंकुश
८९. मा.सौ.नांदगुडे सुजाता विलास

९०. मा.सौ.गारवे सावित्री किशोर

९१. मा.सौ.जगताप कल्पना कैलास

९२. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९३. मा.हनुमंत बाळासाहेब गावडे

९४. मा.उत्तम मुक्ताजी हिरवे

९५. मा.विनायक सुरेश रणसुभे

९६. मा.प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

९७. मा.एकनाथ रावसाहेब पवार

याशिवाय मा.आशीष शर्मा-महापालिका आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.सावळे-अति. अधिक्षक अभियंता, मा.चव्हाण- अति.शहर अभियंता,मा.लोंढे-मुख्यलेखापाल,मा.सवणे,मा.दुधेकर,मा.जाधव-कार्य.अभियंता, मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य) व मा.पवार-प्रशासन अधिकारी (अस्था) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,आयुक्त,अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब,जयप्रकाश सादु कांबळे यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहुन सभा तहकुब करणेत यावी.

मा.उल्हास शेट्टी :- अनुमोदन देतो.

मा.महापौर :- सर्व सन्मा.सदस्यांना मगाशी सूचना केली होती. परंतू काही सदस्य त्यावेळी गैरहजर असतील त्यामुळे पुन्हा एकदा सूचना करतो की येथून पुढे काही मोठी घटना घडली, खूप मोठे कारण असेलतर ठिक आहे. पण कोणाचे निधन झालेतर सभा वारंवार श्रध्दांजली वाहून तहकूब करता येणार नाही, मृत व्यक्तिस आदरपुर्वक श्रध्दांजली अर्पण करुन सभेचे कामकाज चालू राहिल. आपणही सभा तहकूब करण्याचा आग्रह करु नये. कारण सभा तहकुब करुन आपण जनतेचा वेळ वाया घालवितो. ख-या अर्थाने कामाद्वारे आदरांजली वाहण्याची प्रथा पाडूयात. सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

**(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)**

**---------**

**मा.महापौर :- उपस्थित सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेवुन त्यांच्या संमतीप्रमाणे सोमवार दि.२१.१२.२००९ रोजी दुपारी २.३० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.**

**(बहल योगेश मंगलसेन)**
**महापौर**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक - ३७

सभावृत्तांत

(दि.१८.९.२००९, ३.११.२००९ व १९.१२.२००९ ची तहकूब सभा )

दिनांक :- २१.१२.२००९ वेळ :- दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.१९.१२.२००९ ची तहकूब मा.महापालिका सभा सोमवार दिनांक २१.१२.२००९ रोजी दुपारी २.३० वा. महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा.बहल योगेश मंगलसेन | महापौर |
| २. | मा.आसवानी डब्बु | उपमहापौर |
| ३. | मा.भालेकर शांताराम कोंडीबा | |
| ४. | मा.जाधव विजया अशोक (मामी) | |
| ५. | मा.दत्तात्रय बाबुराव साने | |
| ६. | मा.सौ.अलकाताई बाळासाहेब यादव | |
| ७. | मा.लोखंडे सुजाता सुनिल | |
| ८. | मा.बो-हाडे शरद परशुराम | |
| ९. | मा.आल्हाट शांता महेंद्र | |
| १०. | मा.डॉ. सौ. मीना पाटील | |
| ११. | मा.कुंभार रामदास तानाजी | |
| १२. | मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे | |
| १३. | मा.सौ. बढे सुलोचना बबन | |
| १४. | मा.गवळी विजया पंडित | |
| १५. | मा.अजित दामोदर गव्हाणे | |

१६. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

१७. मा.महेश किसन लांडगे

१८. मा.फुगे सुनंदाताई विजय

१९. मा.आशा अंकुश  लांडगे

२०. मा.मोहिनी विलास लांडे

२१. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर

२२. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२३. मा.सावळे  सिमा

२४. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२५. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२६. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२७. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

२८. मा.यशवंत भोसले

२९. मा.कदम निर्मला सदगुरु

३०. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

३१. मा.काळूराम मारुती पवार

३२. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३३. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३४. मा.भापकर मारुती साहेबराव

३५. मा.शेट्टी जगदिश

३६. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

३७. मा.बोबडे  भिमा सखाराम

३८. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

३९. मा.गवळी शशीकिरण

४०. मा.तानाजी विठ्ठल खाडे

४१. मा.उबाळे वैशाली संजय

४२. मा.सुमनताई मधुकर पवळे

४३. मा.कुमार आर. एस.

४४. मा.उल्हास शेट्टी

४५. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

४६. मा.कुटे गोपाळ नाना

४७. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

४८. मा.भोंडवे तुकाराम महादू

४९. मा.खानोलकर मनोज विक्रम

५०. मा.गणेश तुकाराम भोंडवे

५१. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५२. मा.वाघ रघुनाथ दलपत

५३. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

५४. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

५५. मा.तिकोने हरिभाऊ किसन

५६. मा.गावडे जयश्री वसंत

५७. मा.रामआधार धारिया

५८. मा.ॲड. अमर साधूराम मुलचंदानी

५९. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

६०. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव

६१. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

६२. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे

६३. मा.भाऊ उर्फ कैलास गबाजी थोपटे

६४. मा.भारती ज्योती सुखलाल

६५. मा.कोकणे संतोष अंकुश

६६. मा.सुतार विजया विजय

६७. मा.दरेकर सतीश दगडू

६८. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

६९. मा.बारणे संतोष नागु

७०. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

७१. मा.आदियाल (शीख) शोभा गुरुमितसिंग

७२. मा.सौ.नांदगुडे सुजाता विलास

७३. मा.प्रशांत शितोळे

७४. मा.अशोकभाई सोनवणे

७५. मा.सौ.गारवे सावित्री किशोर

७६. मा.सौ.जगताप कल्पना कैलास

७७. मा.जगताप शंकर पांडुरंग

७८. मा.एकनाथ मोटे

७९. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

८०. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

८१. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

८२. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

८३. मा.हनुमंत बाळासाहेब गावडे

८४. मा. विनायक सुरेश रणसुभे

८५. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

८६. मा. एकनाथ रावसाहेब पवार

याशिवाय मा.आशिष शर्मा-महापालिका आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख,मा.गायकवाड,मा.मुंढे,मा.पवार-सहा.आयुक्त,मा.काळे-नगरसचिव, मा.लोंढे-मुख्य लेखापाल,मा.सुरगुडे-विकास अभियंता,मा.सावळे-अति.अधिक्षक अभियंता,मा.तुपे-सह शहर अभियंता, मा.पाटील- उपसंचालक (नगररचना), मा.डॉ.कुणचगी-आरोग्य वैद्यकीय अधिकारी,मा.डॉ.अय्यर-वैद्यकीय संचालक,

मा.शिर्के-मुख्य वास्तु शास्त्रज्ञ, मा.सवणे, मा.इंगळे, मा.दुधेकर, मा.जाधव-कार्य.अभियंता, मा.भारती -प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ),मा.जाधव-शिक्षणाधिकारी (माध्य), मा.साळुंखे-मुख्य उद्यान अधिक्षक,मा.सूर्यवंशी-कायदा सल्लागार,मा.गायकवाड-जनतासंपर्क अधिकारी व मा.पवार-प्रशासन अधिकारी (अस्था) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

--------------------

मा.महापौर :- उपस्थित मा.नगरसेवक व नगरसेविका,आयुक्त,अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) मा.महापालिका सभा क्र.३५ दि.२०.०७.२००९, १२.०८.२००९ व २१.०८.२००९ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

२) मा.महापालिका सभा क्र.३६ दि.१२.०८.२००९ व २१.०८.२००९ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------------------

मा.जितेंद्र ननावरे **:-** मा.महापौर साहेब,विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/१२५०/०९ दि.३०/७/२००९

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८८७५ दिनांक ६/०८/२००९

झोपडपट्टीतील रहिवाश्यांची आर्थिक परिस्थिती बेताची असले मुळे त्यांना इतर नागरीकांपेक्षा कमी दराने पाणीपुरवठा करणे आवश्यक आहे. मीटर पध्दत अवलंबण्यापुर्वी पाणीपट्टी दर फ्लॅट पध्दतीने र.रू.१,२७६/- व झोपडपट्टीसाठी र.रू.८८५/- असा होता. यामध्ये झोपडपट्टी धारकांसाठी ३०% प्रमाणात कमी दर असल्यामुळे मीटर पध्दतीने दर हजार लिटर्स र.रू.२=५० च्या दरात ३०% प्रमाणात कमी दर म्हणजे दरमहा ३०,००० लिटर साठी रूपये १=७५ प्रती दर हजार लिटर्ससाठी व दरमहा ३०,००० लिटर्स वरील पाणी वापरासाठी यापुर्वीचे मीटर पध्दतीच्या दराने झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पातील लाभधारकांना तसेच अधिकृत झोपडपट्टी धारकांना पाणी दर आकारणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, झोपडपट्टीतील रहिवाश्यांसाठी पाणी वाटपासंदर्भातील विषय आहे. आपण प्रति १००० लिटरला रु.२=५० दर ठेवला आहे. हाच दर आपण झोपडपट्टीवासियांसाठी रु.१.७५/- ठेवण्याचा विषय आहे. झोपडपट्टीतल्या ज्या झोपडपट्टीवासियांचे पुनर्वसन झाले अशा झोपडपट्टीवासियांना पुणे महानगरपालिकेत रु.३००/- इतका दर घेतला जातो. त्याच धर्तीवर पिंपरी चिंचवड शहरात पुनर्वसित झोपडपट्ट्यांमध्ये रु.३००/- पाणीपट्टी घ्यावी अशी काही संघटनांनी मागणी केली आहे. त्याचा संदर्भ घेऊन विषय ठेवला आहे. प्रशासनाच्या वतीने झोपडपट्टी परिसरात मीटर बसविण्यास मान्यता देतो आहोत. आजपर्यंत रहिवासी भागात प्रशासनाकडून किती भागांत पाण्याचे मीटर बसविले आहेत. त्या बसवलेल्या मीटरपैकी किती मीटर चोरीला गेले आहेत. ते चोरीला गेल्यानंतर प्रशासनाकडून किती मोफत मीटर बसवून दिले आहेत. मीटर चोरी संदर्भात प्रशासनाने काय धोरण आखले आहे याचे स्पष्टीकरण देऊन नंतर विषय मंजूर करावा.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, पाणीबिलासंदर्भात एक उपसूचना करण्यात आली होती. प्रति १,००० लिटरला अडीच रुपये दराने बिल आकारणी करण्यात आली आहे. लोकांची धावपळ चालली आहे. काही ठिकाणी मीटर लागल्यानंतर ज्या लोकांकडे १५/२० भाडेकरु आहेत, त्यांना रु.१२७६/- बील आहे तर दुसरीकडे एका कुटुंबाला ५० ते ६० हजार रुपयांपर्यंत बील आहे. सर्वांना सारखी बीले आली पाहीजेत. सोसायट्यांमध्ये २५ फ्लॅट असतील तर एका घरात ४/५ माणसे राहतात तर एखाद्या घरात १५/२० लोकांचे कुटुंब आहे. जे पाणी वापरत नाहीत त्यांनी बील का भरायचे? सोसायट्यांनी सबमीटर लावावेत अशी सूचना केली पाहीजे. त्यांतही बेसमेण्टचे लोक जास्त पाण्याचा वापर करतात. सोसायटीची भांडणे कोण मिटवणार? विषय समजून घ्या. चार लोकांच्या कुटुंबाला ३०,००० लिटर पाणी पुरते. जे पाणी वापरत नाहीत त्यांना सुद्धा दंड बसतो. मग त्यांच्यामध्ये वाद चालू होतो यावर मार्ग काढला पाहीजे. यावर काय करणार याचा आयुक्तांनी खुलासा करावा. अडीच रुपयानंतर सात रुपये दर होतो. ज्यांच्याकडे १० भाडेकरुंमध्ये एक मिटर आहे, त्यांना प्रत्येक भाडेकरुकरिता एक मिटर मागायला सांगा.

मा.महापौर :- प्रत्येक सोसायटीला एकच मिटर बसवतो. नागरिक जेवढे पाणी वापरतात, तेवढे बील घेतो. बीलाचे डिस्ट्रीब्युशन करणे हा सोसायटीचे चेअरमन यांचा भाग आहे.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, सोसायटीच्या चेअरमनचे कोणाशीही को-ऑर्डीनेशन नसते,त्यांच्यात भांडणे असतात. त्यामुळे ते सब-मीटर बसवत नाहीत, बीले भरायला तयार नाहीत. सब-मीटर बसवले तर ते जेवढे पाणी पाहीजे तेवढेच वापरतील. तुम्हाला तुमचे बील मिळेल. तुमच्याकडून तसे आदेश द्यावेत म्हणजे नागरिक सब-मीटर बसवतील.

मा.महापौर :- आपण सोसायट्यांना तसे कळवून टाकू, त्यांच्या चेअरमनने त्यांचे सबमीटरचे कनेक्शन घ्यायचे काम करायचे आहे.

मा.मंगला कदम :- मा.महापौर साहेब, काही सोसायट्यांमध्ये एका इमारतीत २०/२०, ४०/४० फ्लॅट आहेत. एक कनेक्शन दिलेतर पुरेसे पाणी मिळत नाही. सोसायटीला पाणी पुरले नाहीतर एक इंची कनेक्शन घ्यावे लागते. ते पाणी बेसमेंटच्या टाकीत मिळते. त्यानंतर ते पाणी वर चढवायला प्रत्येक फ्लॅट धारकाला एम.एस.ई.बी.चे कॉन्ट्रीब्युशन सुद्धा द्यावे लागते. म्हणजे फ्लॅट धारकाचे नुकसान होते.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो. अनेक लोकांना सहा महिन्यांनंतर बीले आली आहेत काही लोकांना आलेली नाहीत. ४ माणसांच्या कुटूंबाला १६ ते १८ हजार इतके बील आलेले अनेक लोक माझ्याकडे आलेले आहेत. झोपडपट्टीतील लोकांना सवलत देत असताना इतर नागरिकांचादेखील विचार केला पाहीजे. बीले वेळेत दिलेली नाहीत. दोन महिन्यांचे बील काढले गेले आहे तेही वेळेत देत नाहीत. तुमच्याकडे रिडींगप्रमाणे बील द्यायला सिस्टीम नाही. यावर्षी मीटरप्रमाणे बील घेऊ नका. बीले उशीरा आली आहेत. फ्लॅटप्रमाणे बीले लावण्याची यंत्रणा नाही. युनिटप्रमाणे बीले द्यावीत. १२०० प्रमाणे बीले देऊ शकतो. चार माणसांचे कुटूंब १६,००० इतके बील कुठून भरणार? मी उपसूचना देतो.

मा.महापौर :- उपसूचना द्यायला हरकत नाही. बीलाचा प्रॉब्लेम आहे. सर्व सदस्यांनी कोणत्या अडचणींना तोंड देतोय ते लेखी स्वरुपात उदाहरणांसहीत पुराव्यासह तुपे साहेब यांच्याकडे द्यावे. पाणी मिटर या विषयावर स्वतंत्र मिटींग घेऊ. ८ दिवसांत या विषयावर लेखी स्वरुपात द्या. तुपे साहेब यावर सर्वे करतील, इन्स्ट्रक्शन्स देतील. अभिप्राय तयार झाल्यानंतर आपण मिटींग घेऊ.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, सर्वांना सरसकट बीले द्या. Economically weaker section मधील लोक झोपडपट्टीतील लोकांसारखेच आहेत. दीड/दोन खोल्यांमध्ये राहणाऱ्या व्यक्तींना तुम्ही काय

उत्तर देणार? त्यांची सुद्धा उपसूचना घ्या. पुण्याप्रमाणे एरियाप्रमाणे बीलाची आकारणी ठेवा.

मा.महापौर :- पुण्याप्रमाणे रेट लागू करायचे तर मग आजपासून करु पण त्यांचा रेट आपल्यापेक्षा जास्त आहे.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, दोन महिन्याचे रिडींग घेतले त्याला मल्टीप्लाय केले असे ॲव्हरेज बील दिलेले आहे. मीटरप्रमाणे बील नाही.

मा.आयुक्त :- दि.१ एप्रिल पासून मीटरप्रमाणे बील देणार आहोत. १ एप्रिल ते २० जून या कालावधीपर्यंतचे बील देणार आहोत. पहिल्यांदा १ एप्रिल ते २० एप्रिल या कालावधीचे बील कसे काढणार, साधे लॉजिक वापरा. ॲव्हरेज बील येईल त्याच्यापुढे actual reading येईल. २० जून नंतर २० सप्टेंबर केले तर ते actual reading येईल. पुढील वेळी हा प्रॉब्लेम येणार नाही.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, अडीचचे साडे तीन करा पण हे देऊ नका.

मा.आयुक्त :- काही लोकांना अडीच हा रेट मान्य आहे. सगळ्यांचा विचार घ्यावा लागेल.

मा.दत्तात्रय साने :- सर्व भागात मिटर बसवले आहेत का? काही ठिकाणी पाणी कमी येते पण फक्त हवेच्या प्रेशरने मिटर फिरले जातात. चिखली येथे हवेने मिटर फिरले जातात, पाण्याला प्रेशर नाही याचा प्रशासनाने विचार करावा. झोपडपट्टयांतील भागात पाण्याची समस्या आहे. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

पिं.चि.मनपामधील नव्याने समाविष्ट गावांना अजुनही पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा उपलब्ध होत नाही. म्हणुन झोपडपट्टीचेच दर समाविष्ठ गावांनाही लागु करावा.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

झोपडपट्टी सोडून इतर भागात राहणाऱ्या नागरिकांना मीटरप्रमाणे बील घेताना रुपये अडीच (२.५) दर हजारी या दराने घेणेत यावा.

मा.राजू मिसाळ :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.मारुती भापकर :- पाण्याच्या विषयात अनेक त्रुटी राहिल्या आहेत. हा विषय तहकूब ठेवून स्पेशल मिटींग घ्यावी. प्राधिकरणाच्या भागात वेगवेगळ्या समस्या आहेत. झोपडपट्टी परिसरात मीटर लावण्याचा प्रयत्न करणार आहोत. अनेक समस्या वाढणार आहेत. हा विषय तहकूब ठेवावा.

मा.महापौर :- विषय करण्याबद्दल दुमत नाही. संपुर्ण शहरासाठी पाण्याचा ज्वलंत प्रश्न आहे. सर्वांना भेडसावणारा विषय आहे. आपण आपले प्रश्न लेखी स्वरुपात तुपे साहेबांकडे द्या. त्याची एक प्रत माझ्याकडे द्या. सगळे प्रश्न ऐकून घेतले आहेत. सगळे प्रश्न एकत्रित करुन खास या विषयावर जी.बी. बोलवावी यासाठी तुम्ही सगळ्यांनी सहकार्य द्यावे. झोपडपट्टीतील पाण्याचा रेट आपणच सुचवला आहे.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देते.

मा.महेश लांडगे :- ग्रामीण भागाबद्दल दिलेल्या उपसूचना स्विकारून विषय मंजूर करा. नवीन गावांना पाणी मिळत नाही, हा विषय नागपूर अधिवेशनात घेतला जाणार आहे. दरामध्ये नंतर बदल करु शकतो. आत्ता हा विषय करुन घ्या.

मा.महापौर :- फक्त ग्रामीण भागातील लोकांना नाहीतर सोसायटीत राहणाऱ्यांना पण त्रास होतो. हा फक्त झोपडपट्टीवासियांचा विषय आहे. तुम्ही लेखी स्वरुपात निवेदनाची एक प्रत माझ्याकडे व एक प्रत तुपे साहेब यांच्याकडे द्यावी. पाणी या विषयावर जी.बी. ठेवू.

मा.महेश लांडगे :- हा विषय शंभर टक्के केलाच पाहीजे. झोपडपट्टीपेक्षा बेकार हाल नवीन समाविष्ट गावांमध्ये आहेत. फ्लॅटधारकांसाठी वेगळे रेट लावा. ग्रामीण भागासंदर्भात विषय आहे. त्या भागातील नगरसेवकांना नागरिक प्रश्न विचारतात.

मा.महापौर :- १५ दिवसांचा प्रश्न लेखी स्वरुपात द्या.

मा.रामदास कुंभार :- मा.महापौर साहेब,आमची सहमती नाही. अडीचचे तीन करा पण पुरेसे पाणी द्या.

मा.महेश लांडगे :- मा.महापौर साहेब, आमचा विषय समाविष्ट गावांसंदर्भात आहे. अशाप्रकारचा विषय ग्रामीण भागांकरिता का आला नाही. अजूनही आम्ही खड्ड्यांतून पाणी भरतोय. रात्री २/३ वाजता पाणी येते तेव्हा महिला जागून पाणी भरतात. झोपडपट्टीपेक्षा वाईट परिस्थिती आहे.

मा.महापौर :- जे.एन.यू.आर.एम.च्या गाईडलाईन आहेत,त्याप्रमाणे इतका दर आकारला पाहीजे अशी सक्ती केंद्र शासनाने,राज्य शासनाने केलेली आहे. हा विषय तहकूब ठेवू या. उपसूचना मांडली तरी मान्य होणार नाही. त्यामुळे संबंधितांना त्यांच्या उपसुचना मागे घेण्यास सभेनी परवानगी दिलेली आहे. तुम्हाला जे वाटते ते लेखी स्वरुपात द्या. प्रशासनाच्या मते आपण काय करु शकतो. कुठे पाणी मिळते, कुठे पाणी मिळत नाही म्हणून स्पेशल जी.बी. बोलवू. शहरातील प्लॅट किंवा प्राधिकरणातील बंगले किंवा ग्रामीण भाग सर्वांची ज्वलंत अडचण आहे. आत्ता विषय मंजूर करायचा का तहकूब करायचा हा निर्णय घ्या.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब,जे.एन.एन.यू.आर.एम.चे नॉर्मस् च्या माध्यमातून हे चालले आहे. आयुक्त साहेब, जे.एन.एन.यू.आर.एम.च्या नॉर्मस् साठी लोकांवर सक्ती करणार आहेत का. प्रत्येक गोष्ट जे.एन.एन.यू.आर.एम.च्या लेवलवर होणार का. काही भागात विकास झाला असला तरी इतर भागात जे.एन.एन.यू.आर.एम. माध्यमातून विकास होत नाही. त्या माध्यमातून सर्व रिवर्स चालले आहे. झोपडपट्टीपेक्षाही आमचा भाग अतिशय बेकार आहे. त्यांना दीड दोन तास पाणी मिळत असले तरी आमच्याकडे ते सुद्धा मिळत नाही. ग्रामीण भाग झोपडपट्टी भागाच्या अंतर्गत समाविष्ट करावा अशी माझी स्वत:ची भावना आहे.

मा.महापौर :- १५ दिवसांत लेखी स्वरुपात जे निवेदन देतील त्यांना सभागृहात बोलवण्यात येईल.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ७६०                                   विषय क्रमांक :- १
दिनांक :- २१.१२.२००९                                  विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पापु/१२५०/०९
दि.३०/७/२००९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८८७५ दिनांक ६/०८/२००९

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

अनुकूल :- ७०                                          प्रतिकूल :- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २
दिनांक :- १३.२.२००९                                  विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/६/कावि/६०७/०९
दि.१२/०८/२००९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८९६८ दिनांक १८.८.०९

पिंपरी चिंचवड मनपा परिवहन उपक्रमाकरिता आरक्षित असलेल्या तसेच मनपाच्या ताब्यात असलेल्या जागा / विकसीत मालमत्ता पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.यांना हस्तांतरण करणेकामी प्रस्तावात नमुद जागा/मालमत्ता यांचे चालू बाजारभावा प्रमाणे किंमत निश्चिती साठी बराच कालावधी लागणार आहे तथापि अध्यक्ष व व्यवस्थापक संचालक पी एम पी एम एल यांची दि.२४/४/०९ व १२/५/०९ चे पत्रान्वये जागा/मालमत्ता मागणी विचारात घेता प्रस्तावात नमुद प्रमाणेचे क्र.१ ते ६ मधील आरक्षित जागा विकसित केलेल्या मालमत्ता या प्रस्तावात नमुद प्रमाणेचे अट क्र. १ ते ११ अटीनुसार तसेच दि.१९/४/०७ रोजीचे शासन निर्णय प्रमाणे नियोजित कंपनी पी एम पी एम एल यांना चालू बाजार भाव नुसार मा.उपसंचालक नगररचना निश्चित करतील त्या मुल्यांकनास/किंमतीस अधिन राहून प्रस्तावा प्रमाणेच्या १ ते ६ मधील मनपा मालकीच्या व दिर्घ मुदत करारनामा व्दारे ताब्यात आलेल्या जागा/मालमत्ता कायद्याचे कलम ७९ (क) अन्वये तसेच परिवहन उपक्रमासाठी आरक्षित असलेल्या इतर मनपा मिळकती प्रस्तावा प्रमाणेचे मनपा अटीनुसार पी एम पी एम एल नावे हस्तांतर करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब,ठरावाला अनुमोदन देतो.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, महत्वाचा विषय आहे. आत्ताच जागेच्या बाजारभावावर ३/४ तास चर्चा झाली आहे. जागा वर्ग करणार आहोत. सभागृहात पी.एम.पी.एम.एल.चे जे अधिकारी बसले आहेत. त्यांच्या या विषयाशी काडीचाही संबंध नाही. त्यांनी इथे बसायची परवानगी घेतली आहे का. जागा हस्तांतरणाचा विषय आहे. पी.सी.एम.सी.चे कर्मचारी पी.एम.पी.एम.एल.मध्ये कमी असताना जास्त पैसा घेतला जातो. क्लास वनचे अधिकारी इथे येऊ शकत नाहीत का. हा महापौरांचा, आयुक्त साहेबांचा, सभागृहाचा अपमान आहे. इथे जबाबदार माणसे येत नाहीत तोपर्यंत हा विषय करु नये. आपण आपली मालमत्ता हस्तांतरीत करतो आहोत, ते आपले ऐकत नसतील, ते इथे येऊ शकत नसतील तर हा विषय करु नये.

मा.महापौर :- सदरचे आरक्षण पूर्वीपासून पी.सी.एम.टी.करिता आहे. या जागेचा वापर जर पी.एम.पी.एम.एल. करत असेल तर त्यात मॉडीफीकेशन करुन द्यावे लागेल. विषय ठेवत असताना त्याचे बाजारमूल्य नगररचना विभाग ठरवेल. त्याप्रमाणे त्याची किंमत पी.एम.पी.एम.एल.कडून येणे अपेक्षित आहे.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, हे अधिकारी पी.एम.सी.च्या मिटींगला जाऊन बसतात, पण इथे येत नाहीत.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा, अशी सुचना मी मांडतो.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ७६१ विषय क्रमांक :- २
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/६/कावि/६०७/०९ दि.१२/०८/२००९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८९६८ दिनांक १८.८.०९

विषय क्रमांक २चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल :- ७० प्रतिकूल :- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७६२ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.सिध्देश्वर बारणे,मा.प्रकाश बाबर यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समिती सभा ठराव क्र.१३७ दिनांक ११/८/२००९
३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.८९७० दिनांक १८.८.०९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका माध्यमिक शिक्षण विभागाचे अंतर्गत सध्या १७ माध्यमिक विद्यालये व १ क्रिडा प्रबोधनी विद्यालय कार्यरत आहे. या विद्यालयाच्या प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने शिक्षणाधिकारी हे वर्ग १ चे पद असून त्यांचे मार्फत कामकाज चालू आहे. परंतू माध्यमिक विद्यालयांचे वाढते कामकाज तसेच अन्य विभागाशी सतत संपर्क राखणे, मनपा परिसरात स्थलांतर व नैसर्गिक वाढीने विद्यार्थी संख्येत वाढ झाली आहे. तसेच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यावर नियंत्रण इ. कामकाज करावे लागते. यामध्ये समन्वय राखता येत नाही. यासाठी माध्यमिक शिक्षण विभागासाठी शिक्षणविस्तार अधिकारी वर्ग श्रेणी २ चे पद निर्माण केल्यास या पदाच्या मार्फत शाळा तपासणी, पट पडताळणी, तुकड्या व सेवक संच निश्चिती, अनुदान विषयक कामकाज व मा.शिक्षणाधिकारी यांच्या सुचनेनुसार प्रशासकीय व इतर कामकाज तसेच जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाशी संबंधीत कामकाज, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, एस.एस.सी. बोर्ड, शिक्षण उपसंचालक विभागाकडील कामकाज तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यावर नियंत्रण, नवीन शाळा मान्यता, शाळा स्थलांतर आणि मनपाकडील कामकाज इ. कामकाज करणे सोईचे होईल. याशिवाय समन्वयक माध्यमिक यांच्याकडे मनपाची इतर महत्वाची व तातडीची कामे सोपविता येतात. त्यांनी आतापर्यंत वेतन व वेतनेत्तर अनुदान, पेन्शन अनुदान, माध्यमिक शिक्षण विभागाचे अनुदान मंजूर करुन घेऊन मनपाचा आर्थिक फायदा केला आहे. तसेच ते भविष्यात वैद्यकीय उपचार अनुदान, इमारत भाडे अनुदान, प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करत आहेत. या सर्व कामावर आवश्यक ती देखभाल व अंमलबजावणी, पाठपुरावा करणे, या कामासाठी सोबतच्या परिशिष्ठ अ नुसार शिक्षणविस्तार अधिकारी वर्ग श्रेणी २ माध्यमिक हे पद निर्माण करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल :- ७० प्रतिकूल :- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ४

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/क.मु/१९५/०९ दि.१७/८/०९

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९०४२ दिनांक २४.०८.२००९

मनपाच्या सन २००९-१० अंदाजपत्रकात पान क्र.२९० अ.क्र.२ इमारत योजना या लेखाशिर्षाखाली वॉर्ड क्र.१९ स.नं.४९५ मध्ये विरंगुळाकेंद्राचे विस्तारीकरण करणे या नावाने तरतूद करणेत आली असून सदर कामाची निविदा मंजूरी व प्रसिध्दी भोसरी येथील वॉर्ड क्र.२२ लांडेवाडी येथील महादेव मंदीराजवळील मोकळ्या जागेत जेष्ठ नागरिकांसाठीच्या वेटींग शेडचे विस्तारीकरण करणे या नावाने करण्यात आलेली असल्याने सन २००९-१० चे अंदाजपत्रकात प्रस्तावात नमुद प्रमाणे कामाचे नावात दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.ऊल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो -

विभाग-विद्युत मुख्य कार्यालय, लेखाशिर्षकाचे नाव- विशेष योजना- उच्चदाब लघुदाब पोल व तारा हलविणे- कामाचे नाव- क प्रभाग मनपा भवन कार्यक्षेत्रातील रस्ता रुंदीकरणातील अडथळा करणारे व धोकादायक व शहर सुशोभिकरणाकरिता आवश्यक असलेले उच्चदाब व लघुदाब वीजवाहिन्या विभागाने पुरवठा केलेल्या केबल वापरुन हलविणे. (निविदा नोटीस क्र.१२/४-२००७/२००८)-> टेल्को रस्ता रुंदीकरणातील उर्वरित काम व लघुउद्योजक प्रकल्पातील अंतर्गत विद्युतीकरण करणे याकामासाठी वाढीव र.रु.१० कोटीस

प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे. उपरोक्त कामासाठी सन २०१०-११ चे अंदाजपत्रकात तरतूद र.रु.५,६०,००,०००/- करणेत यावी सदरच्या कामाला प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

मा.राजु मिसाळ :- मा.महापौर साहेब, उपसूचनेला अनुमोदन देतो.

मा.तानाजी खाडे :- उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ७६३ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/क.मु/१९५/०९ दि.१७/८/०९
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.९०४२ दिनांक २४.०८.२००९

मनपाच्या सन २००९-१० अंदाजपत्रकात पान क्र.२९० अ.क्र.२ इमारत योजना या लेखाशिर्षाखाली वॉर्ड क्र.१९ स.नं.४९५ मध्ये विरंगुळाकेंद्राचे विस्तारीकरण करणे या नावाने तरतूद करणेत आली असून सदर कामाची निविदा मंजूरी व प्रसिध्दी भोसरी येथील वॉर्ड क्र.२२ लांडेवाडी येथील महादेव मंदीराजवळील मोकळ्या जागेत जेष्ठ नागरिकांसाठीच्या वेटींग शेडचे विस्तारीकरण करणे या नावाने करण्यात आलेली असल्याने सन २००९-१० चे अंदाजपत्रकात प्रस्तावात नमुद प्रमाणे कामाचे नावात दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. विभाग- विद्युत मुख्य कार्यालय, लेखाशिर्षकाचे नाव- विशेष योजना- उच्चदाब लघुदाब पोल व तारा हलविणे- कामाचे नाव- क प्रभाग मनपा भवन कार्यक्षेत्रातील रस्ता रुंदीकरणातील अडथळा करणारे व धोकादायक व शहर सुशोभिकरणाकरिता आवश्यक असलेले उच्चदाब व लघुदाब वीजवाहिन्या विभागाने पुरवठा केलेल्या केबल वापरुन हलविणे. (निविदा नोटीस क्र.१२/४-२००७/२००८)-> टेल्को रस्ता रुंदीकरणातील उर्वरित काम व लघुउद्योजक प्रकल्पातील अंतर्गत विद्युतीकरण करणे याकामासाठी वाढीव र.रु.१० कोटीस प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे. उपरोक्त कामासाठी सन २०१०-११ चे अंदाजपत्रकात तरतूद र.रु.५,६०,००,०००/- करणेत यावी सदरच्या कामाला प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल :- ७० प्रतिकूल :- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ५
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क मु,वाहतुक/कावि/४५७ /०९ दि.१६/२/०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५९५ दिनांक १५/०५/२००९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७०२ दि.२१.०८.२००९ अन्वये

पिंपरी चिंचवड म.न.पा.हद्दीतील निगडी जकात नाका व पिंपरी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळया मागील मोकळया जागा वाहनतळासाठी विकसीत करणेकामी र.रु.१,१७,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.यशवंत भोसले :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड म.न.पा.हद्दीतील निगडी जकात नाका व पिंपरी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळया मागील मोकळया जागा विकसित करायला हरकत नाही. या दोन्ही जागांवर वाहनतळ विकसित करण्यासाठी रु.१,१७,००,०००/- इतका खर्च करुन काय करणार आहोत. विषय प्रशासनाकडून आला असल्यामुळे खुलासा झाला पाहीजे.

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा, अशी सुचना मी मांडतो.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ७६४ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क मु,वाहतुक/कावि/४५७ /०९ दि.१६/२/०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५९५ दिनांक १५/०५/२००९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७०२ दि.२१.०८.२००९ अन्वये

विषय क्रमांक ५चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल :- ७०　　　　　　　　　　प्रतिकूल :- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ६

दिनांक :- २१.१२.२००९　　　　　　विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्रप्रशा/१/कावि/३६३/२००९ दि.३०.०३.२००९

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५९८ दिनांक १५/०५/२००९

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७०४ दि.२१.०८.२००९ अन्वये

श्री.शहाजी पवार यांना करआकारणी व करसंकलन प्रमुख या र.रु.१००००-१५२०० या वेतनश्रेणीतील पदावर नेमणुक देण्यात येउन या पदाचे महानगरपालिकेच्या मान्यतेस अधिन राहुन वेतनश्रेणीतील बदल न करता सहा.आयुक्त, कर आकारणी व करसंकलन असे पदनाम करणेत आले असल्याने श्री.शहाजी पवार यांची नियुक्ती १ वर्ष पुढे चालु ठेवणेस व पदनाम बदलास मान्यता देणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, शासन मान्यता नसताना किती अधिकारी प्रतिनियुक्तीवर आपल्याकडे काम करतात. शासनाने स्पष्ट सांगितलेले आहे, शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय इथे अधिकारी काम करु शकत नाहीत. ११ सहाय्यक आयुक्त आहेत, त्यापैकी २/३ अधिकारी शासन मान्यतेशिवाय काम करतात. आयुक्त साहेबांनी कसे रुजू करुन घेतले. करसंकलन विभाग प्रमुख श्री.पवार, जकात विभागप्रमुख श्री.मुंढे, पाणीपुरवठा विभागातील ५ शाखा अभियंता, १ सहाय्यक अभियंता व १ कनिष्ठ अभियंता यात आहेत. माझ्याकडे शासनाचे परिपत्रक आहे. त्यात स्पष्ट म्हटले आहे, प्रतिनियुक्ती करताना नगरविकास विभागाची मान्यता असणे आवश्यक आहे.

मा.महापौर :- निवडणूक काळात या अधिकाऱ्यांची आवश्यकता होती म्हणून या अधिकाऱ्यांना आपल्याकडे पाठवले आहे. त्याबद्दलची मान्यता अजून आलेली नाही.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, श्री.राजदेरकर यांना चार वर्षापेक्षा जास्त काम करायला मान्यता नाही. ते इथे राहू शकत नाहीत. प्रशासनाने किती चुका केल्या आहेत. १० सहाय्यक आयुक्त असताना ११वा माणूस घेतात. ४ पेक्षा जास्त वर्षे राहण्यासाठी त्यांनी सी.एम.ची परवानगी घेतली पाहीजे.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा, अशी सुचना मी मांडतो.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर :- BPMC Act मध्ये किमान एक अधिकारी प्रतिनियुक्तीवरील असावा असे असताना आपल्याकडे उलट परिस्थिती आहे. सदरच्या नेमणूका नगरविकास विभागाकडून व्हायला पाहीजे होत्या. विभागीय आयुक्तांकडून नेमणूक झालेल्या आहेत. आपण चुकीचा कारभार करु नये. पुढील वेळी रितसर उत्तर असेल तर हा विषय कायम करण्यात येईल.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ७६५ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्रप्रशा/१/कावि/३६३/२००९ दि.३०.०३.२००९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.५९८ दिनांक १५/०५/२००९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७०४ दि.२१.०८.२००९ अन्वये

विषय क्रमांक ६चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल :- ७० प्रतिकूल :- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ७
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. प्रशा/१/कावि/४८६/०९ दि.६/५/०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६०२ दिनांक १५/०५/२००९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७०५ दि.२१.०८.२००९ अन्वये

श्री.सुभाष डुंबरे, अतिरिक्त आयुक्त यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २/४/२००९ पासून १ वर्षे कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.उल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सुचना मी मांडतो.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ७६६ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. प्रशा/१/कावि/४८६/०९ दि.६/५/०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६०२ दिनांक १५/०५/२००९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७०५ दि.२१.०८.२००९ अन्वये

विषय क्रमांक ७चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल :- ७० प्रतिकूल :- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- ८
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. प्रशा/१/कावि/४८३/०९ दि.६/५/०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६०४ दिनांक १५/०५/२००९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७०६ दि.२१.०८.२००९ अन्वये

श्री.सुधाकर विष्णू देशमुख,सहाय्यक आयुक्त यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक ११/०६/२००९ पासून २ वर्षे कालावधीकरिता मुदतवाढ दे ण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.ऊल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सुचना मी मांडतो.

मा.सुरदास गायकवाड :- मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ७६७ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जा. प्रशा/१/कावि/४८३/०९ दि.६/५/०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६०४ दिनांक १५/०५/२००९
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७०६ दि.२१.०८.२००९ अन्वये

विषय क्रमांक ८चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल :- ७० प्रतिकूल :- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७६८ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/२/कावि/६६१/०९ दि.४.६.०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.१०२ दिनांक ११/०८/२००९

महापालिका आस्थापनेवरील वीजतंत्री अभिनामाची पदे पदोन्नतीने भरताना, तारतंत्री, जनित्रचालक, इले.मोटार पंप ऑपरेटर व ऑपरेटर या पदावरील कर्मचा-यांची परस्परांतील जेष्ठतेनुसार, पदोन्नतीसाठी तात्पुरती सेवाजेष्ठता यादी तयार करावी व त्यामधुन सेवाजेष्ठ कर्मचा-यांना वीजतंत्री पदावर पदोन्नती देणेत यावी या धोरणास मान्यता देणेत येत आहे.

मा.ऊल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -
अनुकूल :- ७० प्रतिकूल :- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १०
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१)मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/हॉकर्स/१/कावि/ ६१०/०९ दि.१८ .७.०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.११३ दिनांक ११/०८/२००९

महापालिकेने तयार केलेल्या हॉकर्स धोरण २००७ यास मा.महापालिका सभा ठराव क्र.१८७ दि.१२/१०/२००७ अन्वये मान्यता मिळालेली आहे तो रद्द करुन महाराष्ट्र शासनाने नव्याने दिलेल्या फेरीवाला व्यवसायाच्या आदर्श उपविधी २००९ नुसार "पिंपरी चिंचवड महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) आदर्श उपविधी २००९"मसुद्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.ऊल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.मंगला कदम :- मा.महापौर साहेब, शहरात हॉकर झोनचा प्रश्न अजूनही पेंडींग आहे. ज्या हातगाड्या,टपऱ्या पूर्वीपासून चालू आहेत त्यांना मान्यता मिळाली पाहीजे. फिरत्या गाड्यांना लायसन दिले पाहीजे. फिरत्या हातगाडीवाल्यांकडून कर वसूल करतो, मात्र त्यांना लायसन दिले जात नाही. प्रत्येक टपरीधारकाला अधिकृत लायसन द्या. टपरीवाल्यांचा विषय पूर्वी झाला आहे, त्याप्रमाणे प्रस्ताव घेऊन त्यात सर्वांचा विचार झाला पाहीजे. व्यावसायिक अधिकृतरित्या शहरात आले पाहीजेत.

मा.आर.एस.कुमार :- मा.महापौर साहेब, ६० वॉर्डामध्ये ३०० अधिकृत टपऱ्यांचे वाटप महानगरपालिकेकडून करण्यात आले होते. त्याला कसे काय कॅन्सल करणार. याशिवाय १०० टपऱ्यांना परवानगी दिली आहे. जेथे ट्रॅफीकला अडथळा येतो आहे तेथे कॅन्सल करा.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, महापालिकेने तयार केलेल्या हॉकर्स धोरण २००७ यास मा.महापालिका सभा ठराव क्र.१८७ दि.१२/१०/२००७ अन्वये मान्यता मिळालेली आहे तो रद्द करुन महाराष्ट्र शासनाने नव्याने दिलेल्या फेरीवाला व्यवसायाच्या आदर्श उपविधी २००९ नुसार "पिंपरी चिंचवड महानगरपालिका फेरीवाला व्यवसायाचे (विनियमन) आदर्श उपविधी २००९"मसुद्यास मान्यता देतो आहोत. ठ.क्र.१८७ दि.१२/१०/२००७ चा प्रस्ताव सगळ्यांनी मिळून मंजूर करुन आणला होता. मनपा हॉकर्स धोरण २००७ वर पुणे महानगरपालिकेच्या धोरणाची प्रत आणून तशाप्रकारचे धोरण पाठवले होते. शहरात प्रभाग स्तरावर सगळे पथारीवाले, टपरीवाले यांचा सर्वे करण्यात आला होता. टपरीवाले, हातगाडीवाले या आशेवर होते की, अधिकृत टपऱ्या मिळतील. २००९ साली तुम्ही नवीन धोरण आणताय. पूर्वी हे सर्व झालेले तुम्ही कसे ग्राह्य धरणार ते स्पष्ट करावे. टपरीधारक कमीत कमी १५ वर्षे शहराचा रहिवासी पाहीजे असे नवीन धोरणात आहे. कमीत कमी १५ वर्षाऐवजी ५ वर्षाचा रहिवास असावा अशी दुरुस्ती करावी. हे त्यांच्यासाठी सुकर होईल. हॉकर्स झोनसाठी रस्त्यांची निवड करणार आहोत. तशा प्रकारचे धोरण राबविले तर व्यावसायिकांचा फायदा व्हायला पाहिजे. त्यांची पोटे चालली पाहीजेत अशा प्रकारची दुरुस्ती करावी. महाराष्ट्र शासनाने पाठविलेल्या उपविधी २००९ वर प्रशासनाने स्पष्टीकरण करावे. मनपाचे धोरण मान्य करावे का महाराष्ट्र शासनाचे यावर स्पष्टीकरण द्यावे.

मा.आयुक्त :-सुप्रिम कोर्टाने डिसिजन दिला आहे, सुप्रिम कोर्टाच्या इन्स्ट्रक्शनच्या अनुषंगाने एक कमिटी केली आहे. त्याप्रमाणे शासनाने सुप्रिम कोर्टाकडे रेकमंडेशन केले आहे. सुप्रिम कोर्टाच्या डायरेक्शनप्रमाणे शासनाने बाय-लॉज तयार केले आहेत. ते मनपाकडे सर्क्युलेट केले आहेत. पूर्वी मनपाने २००७ मध्ये केलेल्या नियमांमध्ये ५ वर्षे रहिवास नमूद केलेला आहे. नवीन उप-विधींमध्ये १५ वर्षे टाकले आहे. प्रभाग स्तरावर कमिटी स्थापन करुन बदल सुचविले आहेत. आम्ही बदल केले आहेत. तक्ता तयार केला आहे.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १०चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सुचना मी मांडतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, सुचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर :- सुप्रिम कोर्टाच्या ऑर्डरप्रमाणे काय-काय बदल करायचे ते पुढील मिटींगमध्ये ठरवू. मराठी व इंग्रजी अशा दोन प्रतींत हे बाय-लॉज सदस्यांना मिळाले पाहीजेत. विषयाबद्दल सदस्यांच्या मनात शंका असेल तर चर्चा/अभ्यास करुन घ्या. पुढील वेळी अभ्यास करण्यासाठी सदस्यांना वेळ दिला जाणार नाही.

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ७६९      विषय क्रमांक :- १०
दिनांक :- २१.१२.२००९      विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१)मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भूजि/हॉकर्स/१/कावि/ ६१०/०९ दि.१८.७.०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.११३ दिनांक ११/०८/२००९

विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

अनुकूल :- ७०      प्रतिकूल :- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७७० विषय क्रमांक :- ११
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र. प्रशा/१/कावि/५५५/०९ दि.४.६.०९
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.१३९ दिनांक २४/०८/२००९

पदोन्नती निवड समितीची शिफारस विचारात घेता १.डॉ.श्री.पोळ रमेश बाबुराव-खुला २.डॉ.श्री.कांबळे रमेश श्रीपती खुला(अनु.जाती) ३.डॉ.श्रीमती.यादव कमल अजित (खुला),४.डॉ.श्री.इनामदार तृप्ती रत्नाकर (खुला) ५.डॉ.श्री.जेरे ध्रुव अनंत (खुला) ६.डॉ.श्री.मार्कंडेय प्रशांत अनंत (खुला) या वैद्यकिय अधिका-यांना जेष्ठ वैद्यकिय अधिकारी पदावर र.रु.१०००० - १५२०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल :- ७० प्रतिकूल :- ०
अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७७१ विषय क्रमांक :- १२
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.तानाजी खाडे व मा.बाळासाहेब भुंबे यांचा प्रस्ताव..
२) मा.झोपडपट्टी सुधार,गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती सभा दिनांक २०.७.२००९, ठराव क्रमांक ६
३) मा.विधी समितीकडील ठ.क्र.१४१ दिनांक २४/०८/२००९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील झोनिपु (स्था) विभागात श्री.डी.एन.गड्डुवार उपअभियंता पदावर काम करित आहेत. ते अनुसूचित जमाती या प्रवर्गातील आहेत तसेच त्यांची या पदावर तीन वर्षे सेवा पुर्ण झालेली आहे. कार्यकारी अभियंता संवर्गातील अनुसूचित जमातीचे पद बरीच वर्षे रिक्त आहे व

या संवर्गात श्री.गट्टुवार हे सर्वात जेष्ठ आहेत. श्री गट्टुवार यांचा झोनिपु (स्था) विभागातील १५ वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे. या अनुभवाचा या विभागातील कामांचे नियोजन व कार्यवाहीसाठी मोठा उपयोग होणार आहे. सदर संवर्गातील उमेदवारांवर अन्याय होउ नये यासाठी श्री.गट्टुवार यांना निम्नस्तरावरील पदाच्या अनुभवाची अट शिथील करुन कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, शासनाचा जी.आर. असताना सुद्धा अनधिकृत पदोन्नत केले जाते. कुठल्याही अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्याची जात पडताळणी झाल्याशिवाय त्याला कामावर घेऊ नये असा १९९८ चा जी.आर. असतानासुद्धा २००० पासून नियुक्त्या केल्या आहेत. जी.आर.प्रमाणे श्री.गट्टुवार पदाची अर्हता पूर्ण करतात. २००१ साली श्री.बरशेट्टी यांना कार्यकारी अभियंता पदासाठी पदोन्नती देण्यात आली होती. २००८ मध्ये त्यांची प्रमाणपत्रे अवैध ठरविल्यानंतरसुद्धा त्यांना या पदावर ठेवण्यात आले आहे. श्री.गट्टूवार यांना पदोन्नती २००६ पासून द्यावयास पाहिजे होती. प्रशासनाने याबाबतीत हलगर्जीपणा दाखवला आहे. २००० मध्ये श्री.गट्टूवार पात्र असतानापण त्यांच्यावर अन्याय झाला आहे. पदोन्नती देत असताना पदाच्या अनुषंगाने अटी शिथील करण्याची गरज नाही. श्री.गट्टूवार या पदावर पात्र आहेत. त्यांना सरळ सेवेत पदोन्नती मिळावी. विषय मंजूर करण्यात यावा.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल :- ७० प्रतिकूल :- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक :- ७७२ | विषय क्रमांक :- १३ |
| दिनांक :- २१.१२.२००९ | विभाग :- मा.आयुक्त |

संदर्भ-१) मा. शकुंतला धराडे मा.ज्योती भारती यांचा प्रस्ताव
२) मा. महिला व बालकल्याण समितीकडील ठ.क्र.५ दिनांक २४/८/२००९

प्रभाग क्र.४८ निगडीगावठाण येथील योजना क्र.१० समोरील मोकळया जागेत महिलांसाठी भाजी मार्केट साठी बहुउद्देशीय इमारत बांधणेकामी र.रु.९९,५०,०००/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.ऊल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, मला उपसूचना मांडावयाची आहे.

मा.महापौर :- पैसे कुठून आणायचे. आपण ओरडतो बीले भागवायला पैसे नाहीत. अधिकार स्थायी समितीला दिला आहे. विषय त्यांच्याकडे द्यायला पाहीजे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, आपण अशा सूचना पार्टी मिटींगमध्ये दिल्या तर बरे होईल.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल :- ७० प्रतिकूल :- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७७३ विषय क्रमांक :- १४
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ)

संदर्भ- १) क्र.शिक्षण/आस्था/कावि/१८५/२००९, दिनांक ३०/०४/२००९
२) मा.शिक्षण मंडळाकडील ठ.क्र.३७७ दिनांक २२/५/२००९

शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई- ३२ यांचेकडील आदेश क्रमांक- एसएओ ३१०८/प्र.क्र.१८/(२)/प्रशा-२ दिनांक १५ मे, २००८ अन्वये श्री.एच.बी. भारती प्राध्यपक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांची प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर शासनाच्या अटी व शर्तीस अधीन राहून प्रथमतः २ वर्षाच्या कालावधीकरीता प्रतिनियुक्तीवर नेमणूक करण्यात आलेली होती.

त्यानुसार श्री.एच.बी.भारती हे दिनांक २१/०५/२००८ रोजी पिंपरी चिंचवड मनपा शिक्षण मंडळ कार्यालयात रुजू झाले असून, मा.आयुक्त, पिंपरी

चिंचवड मनपा यांचेकडील आदेश क्र.प्रशासन/०१/कावि/३६२/२००८, दि.२१/०५/२००८ अन्वये त्यांना शिक्षण मंडळ व मनपा सभेच्या उमेद मान्यते अधिन दोन वर्ष कालावधीकरीता रुजू करुन घेण्यास मान्यता दिली आहे.

श्री.एच.बी.भारती प्रशासन अधिकारी यांना मा.शिक्षण मंडळ सभा ठराव क्रमांक १८८ दिनांक ०७/०६/२००८ अन्वये २ वर्षासाठी प्रतिनियुक्तीस मंजूरी देण्यात आली होती. सदरचा ठराव मा.मनपा सभेकडे मान्यतेसाठी पाठविले असता मा.मनपा सभा ठराव क्रमांक ४४३ दिनांक १९/०९/२००८ अन्वये केवळ १ वर्षासाठी प्रतिनियुक्तीस मंजूरी दिली आहे.

श्री.एच.बी.भारती महानगरपालिकेच्या प्रशासन अधिकारी पदावर दिनांक २१/०५/२००८ रोजी रुजू झाल्याने १ वर्षाची मुदत दिनांक २०/०५/२००९ रोजी संपुष्टात येणार आहे. त्यामुळे पुढील एका वर्षाची वाढ देणे कामी सदरचा विषय मा.शिक्षण मंडळ सभेपुढे विचारार्थी ठेवण्यात आला होता त्यावर सर्व सदस्यांनी सांगोपांग चर्चा करुन मुदत संपल्यापासून पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यास सभेत सदरचा विषय सर्वानुमते मंजुर करण्यात आला. सदरचा विषय कायम होणेची वाट न पहाता मा.महापालिका सभेकडे मंजूरीसाठी पाठवण्यात यावा.

उपरोक्तप्रमाणे मा.शिक्षण मंडळाचा ठराव आला आहे. मा.शिक्षण मंडळाच्या ठरावाप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल :- ७० प्रतिकूल :- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १५

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/६/कावि/४७६/२००८ दि.०८/१०/२००८

२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७०७ दि.२१.०८.२००९ अन्वये

श्री.अख्तरहुसेन तालुकदार चौधरी- नगरसेवक यांचेवर अँटी करप्शन ब्युरो पथकाने लाच स्वीकारलेबाबत पिंपरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.३१३२/०८ दाखल केलेला आहे. श्री.चौधरी यांचेवर कारवाई करणेबाबत विविध संघटनांकडून मागणी करण्यात आल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३ नुसार निर्णयार्थ प्रकरण मा.महापालिका सभेपुढे सादर करण्यात आले होते. मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक ३९२, दि.२०/०६/२००८ अन्वये कायद्यातील तरतुदीनुसार श्री.चौधरी- नगरसेवक यांना नोटीस देऊन त्यांचा खुलासा घेण्याची जबाबदारी आयुक्तांवर सोपविली होती.

मा.महापालिका सभेने ठराव क्रमांक ३९२, दिनांक २०/०६/२००८ अन्वये सोपविलेल्या जबाबदारीनुसार श्री.चौधरी-नगरसेवक यांचा खुलासा घेण्यासाठी नोटीस क्रमांक प्रशा/६/कावि/३०६/२००८, दिनांक ०३/०७/२००८ पोचदेय टपालाने श्री.चौधरी- नगरसेवक यांचे निवासस्थानी पाठविण्यात आली होती. तथापि श्री.चौधरी यांनी नोटीस न स्वीकारल्याने नोटीसचे बंद पाकिट Not Claimed अशा पोस्टाच्या शेरांकनासह महापालिकेस पुन्हा प्राप्त झाले होते. पोस्टाने पाठविलेली नोटीस श्री.चौधरी यांनी न स्वीकारल्याने महापालिकेचे तपासणी पथक प्रत्यक्ष त्यांचे निवासस्थानी पाठवून वरील नोटीस श्री.चौधरी यांना दिनांक ०८/०९/२००८ रोजी समक्ष देण्यात आली व नोटीस मिळाल्याची त्यांची दिनांकित स्वाक्षरी घेण्यात आलेली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अहवालानुसार श्री.चौधरी यांनी भ्रष्टाचारासारखा गंभीर गुन्हा केल्याचे दिसून येत असल्याने त्यांचे पालिका सदस्यत्व रद्द करण्याची शिफारस शासनाकडे का करु नये, याचा खुलासा १५ दिवसात करणेबाबत श्री.चौधरी यांना नोटीसद्वारे कळविण्यात आले होते. तथापि अद्यापपर्यंत श्री.चौधरी यांचा खुलासा प्राप्त झालेला नाही.

श्री.चौधरी- नगरसेवक यांनी दिनांक २०/०६/२००८ चे पत्राने त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्याची विनंती केली होती. परंतू नोटीसद्वारे अशी संधी देऊनही त्यांनी त्यांची बाजू मांडलेली नाही. सबब उक्त बाबी मा.महापालिका सभेच्या निदर्शनास आणून देऊन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३(१) मधील तरतुदीनुसार करावयाच्या कार्यवाहीचा निर्णय घेण्यासाठी प्रस्तुत प्रकरण मा.महापालिका सभेपुढे फेरसादर करावे. प्रकरणी महापालिका सभेस स्वतंत्र समिती गठीत करुन निर्णय घेता येईल.

उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडुन आला आहे त्याप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

ठराव क्रमांक :- ७७४ विषय क्रमांक :- १५
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/६/कावि/४७६/२००८
दि.०८/१०/२००८
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७०७ दि.२१.०८.२००९ अन्वये

विषय क्रमांक १५ दप्तरी दाखल करणेत येत आहे

अनुकूल :- ७० प्रतिकूल :- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- १६
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/६/कावि/५२/२००९
दि.०५/०२/२००९
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७०८ दि.२१.०८.२००९ अन्वये

वॉर्ड क्रमांक ३५ मधील साफसफाईचे कंत्राटी पध्दतीने काम करणा-या "सुराज्य स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित" या संस्थेचे मार्च २००८ या महिन्याचे साफसफाई कामाचे बिल रुपये ७७,१५०/- मंजूर करण्यासाठी लाचेची मागणी करुन २०,०००/- रुपये लाच स्वीकारली. यासाठी श्री.अख्तरहुसेन तालुकदार चौधरी-नगरसेवक व श्री.जगदीश जामदेव गायकवाड- मुख्य आरोग्य निरीक्षक यांचेवर अँटी करप्शन ब्युरोने लाचलुचपत प्रतिबंधक कायदा कलम ७,१२,१३ (१)(ड) सह १३ (२) नुसार पिंपरी पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३१३२/२००८ दाखल केलेला आहे. सदर गुन्हयाचा तपास अँटी करप्शन ब्युरोने पुर्ण केला असून, श्री.चौधरी-नगरसेवक व श्री.गायकवाड-मुख्य आरोग्य निरीक्षक यांनी लाच रकमेचा स्वीकार करुन उक्त कलमानुसार गुन्हा केल्याबाबत पुरेसा व सबळ पुरावा तपासाअंती उपलब्ध झाला असल्याचे व श्री.चौधरी-नगरसेवक व

श्री.गायकवाड-मुख्य आरोग्य निरीक्षक यांचेवर न्यायालयात खटला दाखल करण्यास सक्षम प्राधिका-याची मंजुरी मिळणेची विनंती मा.पोलीस उपायुक्त/ पोलीस निरीक्षक-अँटी करप्शन ब्युरो,पुणे १ यांनी उपरोक्त दिनांक २१/११/२००८ चे पत्राने केलेली आहे. पत्रासोबत तपासाची कागदपत्रे अवलोकनासाठी सादर केलेली आहेत.

अँटी करप्शन ब्युरोने महापालिकेकडे पाठविलेल्या गुन्हयाचे तपासाच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, दिनांक ०५/०५/२००८ रोजी "सुराज्य स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित" चे अध्यक्ष श्री.उनवणे, तक्रारदार श्री.कांबळे व श्री.चौधरी-नगरसेवक,महापालिकेचे मुख्य आरोग्य निरीक्षक- श्री.गायकवाड या चार व्यक्तींमध्ये रॉक्सी हॉटेल,पिंपरी येथे झालेले संभाषण ध्वनीमुद्रित करण्यात आलेचे दिसून येत आहे. त्यामध्ये श्री.चौधरी-नगरसेवक यांनी २०,०००/- रुपये लाच मागितल्याचे ध्वनीमुद्रण झाल्याचे अहवालामध्ये नमूद आहे. कारवाईच्यावेळी श्री.बाळासाहेब अर्जुन करगळ यांनी पंच क्रमांक १ चे काम केले आहे. संपुर्ण कार्यवाहीबाबत त्याची माहिती दिनांक १२/०५/२००८ रोजी नोंदविण्यात आलेली आहे, ती थोडक्यात पुढीलप्रमाणे.

" तक्रारदार श्री.कंाबळे यांची तक्रार खरी आहे काय, याची पडताळणी दिनांक ०५/०५/२००८ रोजी केली होती त्यादिवशी रॉक्सी हॉटेल, पिंपरी येथे श्री.चौधरी-नगरसेवक यांनी २०,०००/- रुपये लाचेची मागणी केली व सदर रक्कम दिनांक ०६/०५/२००८ रोजी १.०० वाजता आणावयास सांगितले. दिनांक ०६/०५/२००८ रोजी श्री.चौधरी यांनी रॉक्सी हॉटेलात व हॉटेलच्या बाहेर गर्दी असल्याने आज गायकवाड साहेब नाहीत,नंतर बघु," असे सांगून निघुन गेले, त्यानंतर दिनांक ०७/०५/२००८ रोजी श्री. चौधरी-नगरसेवक यांनी दिनांक ०८/०५/२००८ रोजी १२.३० वाजता रक्कम घेऊन येण्यास सांगितलेने दिनांक ०८/०५/२००८ रोजी मोरवाडी रस्त्यावरील हॉटेल घरोंदा येथे सापळा लावण्यात आला. सदर दिवशी पंच क्रमांक १ म्हणून मी काम पाहिले,सफाई कामाचे कंत्राटदार संस्थेचे अध्यक्ष श्री. उनवणे,तक्रारदार श्री.कंाबळे व मी असे तिघेजण घरोंदा हॉटेलात श्री.चौधरी-नगरसेवक यांचेकडे गेलो तेंव्हा श्री.चौधरी यांनी "मी अर्धे पैसे घेणार नाही, पूर्ण पैसे घेईन, असे हिंदीत म्हणाले. थोडावेळ चर्चा झ ाल्यावर श्री.चौधरी-नगरसेवक यांनी तक्रारदार श्री.कंाबळे यांचेकडे लाचेची मागणी करुन लाचेच्या रकमेचा स्वीकार केला."

घटनेच्या दिवशी दिनांक ०८/०५/२००५ रोजीच्या श्री.चौधरी यांच्या जबाबाची प्रत कागदपत्रात आहे "साफसफाईचे कॉंट्रॅक्टनुसार १९ सफाई कामगार प्रत्यक्ष कामावर नसल्याचे दिसून आल्याने त्याची विचारणा कॉन्ट्रॅक्टरकडे केली होती, त्यांनी माझे कमिशन देण्याचे कबूल केले होते म्हणून मी महापालिकेच्या मुख्य आरोग्य निरीक्षक श्री.गायकवाड यांना मी सांगितल्याशिवाय बिल काढू नका, असे सांगितले होते. त्यानुसार आज दिनांक

०८/०५/२००८ रोजी मी कमिशनची रक्कम स्वीकारली आहे”. असा जबाब श्री.चौधरी-नगरसेवक यांचा आहे.

वरील सर्व बाबीनुसार श्री.अख्तरहुसेन चौधरी नगरसेवक हे लाचेची मागणी करणे लाच स्वीकारणे या कार्यवाहीत मुख्य आरोपी असल्याचे दिसून येत आहे. तसेच श्री.चौधरी यांचे जबाबावरुन त्यांनीच श्री.गायकवाड-मुख्य आरोग्य निरीक्षक यांना सुराज्य स्वयंरोजगार संस्थेचे बिल रोखून ठेवण्याच्या सूचना दिल्याचे दिसून येत आहे. तथापि अँटी करप्शन ब्युरोने श्री.गायकवाड यांनाही श्री.चौधरी यांचेसोबत सहआरोपी केलेले आहे.

मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८२ नुसार श्री.चौधरी-नगरसेवक व श्री.गायकवाड-मुख्य आरोग्य निरीक्षक हे लोकसेवक आहेत व लोकसेवकावर न्यायालयात खटला दाखल करण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम १९ नुसार लोकसेवकास सेवेतून काढून टाकण्यास सक्षम असलेल्या प्राधिका-याची मंजूरी असणे आवश्यक आहे. महापालिकेच्या सेवकांचे बाबतीत स्थायी समिती सभा सक्षम प्राधिकारी असलीतरी महापालिका सभा, ही स्थायी समिती सभेची वरिष्ठ प्राधिकारी असल्याने स्थायी समिती सभेचे सर्व अधिकार महापालिका सभेस आहेत तसेच नगरसेवकास पदावरुन काढण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १३ नुसार ३/४ महापालिका सदस्यांच्या शिफारशीवरुन राज्य शासनास आहेत. श्री.चौधरी-नगरसेवक व श्री.गायकवाड-मुख्य आरोग्य निरीक्षक या दोनही लोकसेवकांवर न्यायालयात खटला दाखल करण्यासाठी एकच मंजुरी आदेश मिळण्याबाबत अँटी करप्शन ब्युरोचे पत्रात नमूद आहे. तसा शासन निर्णयही आहे.

उक्तनुसार श्री.चौधरी-नगरसेवक व श्री.गायकवाड-मुख्य आरोग्य निरीक्षक यांचेवर न्यायालयात खटला दाखल करण्यास एकच मंजूरी आदेश द्यावयाचे आहेत व श्री.चौधरी-नगरसेवक यांचेवर खटला दाखल करण्यासाठी ३/४ महापालिका सदस्यांची शिफारस राज्य शासनाकडे पाठविणे आवश्यक असल्याने तशी शिफारस मिळविण्यासाठी सदरचा विषय मा.महापालिका सभेपुढे सादर करावा. शासन निर्णयानुसार “मंजूरी आदेश” देण्याची कार्यवाही कालमर्यादेत करावयाची असल्याने नजिकच्या मा.महापालिका सभेपुढे सदर प्रकरण सादर करावे. अँटी करप्शन ब्युरोचा अहवाल व गुन्हयाच्या तपासाची कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध आहेत.

उपरोक्तप्रमाणे प्रस्ताव मा.आयुक्त यांजकडुन आला आहे त्याप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

मा.ऊल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.जगदीश शेट्टी :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.भाऊसाहेब सुपे :- मा.महापौर साहेब, सूचनेला अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक :- ७७५ | विषय क्रमांक :- १६ |
| दिनांक :- २१.१२.२००९ | विभाग :- मा.आयुक्त |

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/६/कावि/५२/२००९ दि.०५/०२/२००९
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७०८ दि.२१.०८.२००९ अन्वये

विषय क्रमांक १६ दप्तरी दाखल करणेत येत आहे

अनुकूल :- ७० प्रतिकूल :- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.जितेंद्र ननावरे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक :- ७७६ | विषय क्रमांक :- १७ |
| दिनांक :- २१.१२.२००९ | विभाग :- मा.आयुक्त |

संदर्भ- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/पि.गु./२६१/०९ दि.१८/८/२००९

पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारीत मंजूर विकास योजनेमध्ये मौजे पिंपळे गुरव येथील खालील तक्त्यात नमुद केलेली आरक्षणे प्रस्तावित केलेली आहेत. सदर आरक्षणाने बाधित क्षेत्र संपादन करणे/भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे आवश्यक आहेत.

| अ. क्र. | स.नं. | आरक्षण क्रमांक | प्रयोजन | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १. | ४४, ४५ व ४६ पैकी | ३४४ अ | उद्यान | १३०००.०० |
| २. | ४१ पैकी | ३४७ | खेळाचे मैदान | १००००.०० |
| ३. | ७९ पैकी व ८० पैकी | ३५६ | प्राथमिक शाळा वाढीव क्षेत्र | १६००.०० |
| ४. | ७९ पैकी ते ८४ पैकी | ३५५ | लहान मुलांचे खेळाचे मैदान | १३०००.०० |
| ५. | ५१ पैकी व ५२ पैकी | ३४५ | म.न.पा. उपयोग | ४०००.०० |
| ६. | ७२ पैकी | ३४८ | किरकोळ बाजार केंद्र | २०००.०० |
| ७. | ७२ पैकी | ३४९ | शॉपिंग सेंटर | ४०००.०० |
| ८. | ८७ पैकी | ३५९ | उद्यान | ४०००.०० |

उपरोक्त अ.नं.१ ते ५ मधील आरक्षित जमिनीपैकी काही क्षेत्र टी.डी.आर.चे बदल्यात ताब्यात आलेले आहे. या आरक्षणापैकी उर्वरित क्षेत्र ताब्यात आल्याशिवाय सदर आरक्षणे विकसित करता येणार नाही. त्यामुळे सदर आरक्षणातील उर्वरित क्षेत्र भूसंपादन प्रस्ताव पाठवून ताब्यात घ्यावे लागेल. तसेच मंजूर विकास योजनेस १० वर्षाचा कालावधी पुर्ण झालेला असल्यामुळे मंजूर विकास योजनेची अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने अ.नं.६ ते ८ मधील आरक्षित जमीन संपादन करणे आवश्यक आहे.

मंजूर विकास योजनेतील विविध प्रयोजनासाठी असलेल्या आरक्षणाखालील जमिनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील तरतूदीनुसार संपादित करणे आवश्यक असून, त्यासाठी उक्त अधिनियमाचे कलम १२६ मधील तरतुदीनुसार संपादनाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच मा.महानगरपालिका सर्वसाधारण सभेच्या ठरावाद्वारे भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांना सादर होणे आवश्यक असल्याचे निदेश शासनाने दिलेले आहेत.

उपरोक्त तक्त्यात नमुद केलेल्या आरक्षणाखालील जमिनीचे संपादन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ (१) (क) किंवा १२६ (१) (ग) अन्वये करावे लागणार आहे. त्यामुळे उपरोक्त आरक्षणांखालील जमीन संपादन करणेकामी व सदर भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे महापालिकेच्या वतीने सादर करण्याकरिता मा.आयुक्त यांना अधिकार देणे आवश्यक असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.ऊल्हास शेट्टी :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल :- ७० प्रतिकूल :- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७७७ विषय क्रमांक :- १८

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.नगरसचिव

मा. विधी समिती

अ) दि.१७/७/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.७/८/०९ व ११/८/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क)दि.२१/८/०९ व २४/८/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७७८ विषय क्रमांक :- १९

दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.नगरसचिव

मा. महिला व बालकल्याण समिती

अ) दि.११/५/०९ व १८/५/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.६/७/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

क) दि.१७/७/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७७९ विषय क्रमांक :- २०
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.नगरसचिव

मा.झोपडपट्टी सुधार,गृहनिर्माण आणि समाजकल्याण समिती

अ) दि.१५/७/०९ व २०/७/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.५/८/०९ व ६/८/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २१ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७८० विषय क्रमांक :- २१
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.नगरसचिव

मा.क्रिडा समिती

अ) दि.१५/७/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.
ब) दि.५/८/०९ व १०/८/०९ चे सभेचा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २२ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक :- २२
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक क्र.जा.क्र.नरवि/कावि/३क/ ३७०/२००८ दिनांक २२/१२/२००८
२) मा. अ प्रभाग समितीकडील ठराव क्र.११ दि.१२.६.०९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या गावांसाठी प्रारुप विकास योजना सन २००० मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. मौजे तळवडे या गावाच्या दक्षिणेकडील भागाच्या पूर्व-पश्चिम हद्दीकडे पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरणाची हद्द लागू असुन पूर्वेकडे पेठ क्र.२० व पश्चिमेकडील हद्दीत पेठ क्र.२१ व २२ आहेत. सदर दोन्ही पेठांमध्ये प्राधिकरणाच्या विकास योजनेतील ७५ मी. रस्ता विकसीत होत आलेला आहे. तथापि प्रस्तुत ठिकाणी तळवडे हद्दीत प्रारुप विकास योजनेमध्ये सदर रस्त्याची रुंदी ९० मी. प्रस्तावित केलेली आहे.

सदर रस्त्याचे भूसंपादनाकामी संयुक्त मोजनी झालेली आहे. तेथील रहिवाशांनी सदर सिमांकनास तिव्र विरोध केला आहे. प्रकरणाची वस्तूस्थिती लक्षात घेता प्राधिकरणाकडील हद्दीतील विकसीत होत आलेला ७५.०० मी. रस्त्याच्या रुंदीनुसार रस्ता करणे तांत्रिकदृष्ट्या व तत्वतः संयुक्तिक वाटत असल्याने त्यानुसार प्रकरणी ९०.०० मी. रुंदीच्या ऐवजी ७५.०० मी. रुंद करणेबाबतचा प्रस्ताव मा.महापालिका सभेपुढे सादर करण्यात आला असता त्यास महापालिका सभा ठराव क्र.१७९ दि.२२/१०/०७ व ठराव क्र.२३२ दि.८/१/०८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

नव्याने समाविष्ट गावांच्या प्रारुप विकास योजनेस शासनाने दि.३०/५/२००८ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम कलम ३० खाली सादर बदलासह भागशः मंजुरी दिलेली असुन त्यानुसार पाणीपुरवठा व जलनिःसारणाशी संबंधित आरक्षणे व विकास योजना रस्त्यांना मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे सदर तळवडे हद्दीतील ९०.०० मी. रस्ता हा प्रारुप विकास योजनेत प्रस्तावित आहे तसाच मंजुर झालेला आहे. त्यामुळे प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अंतर्गत सदर रस्त्याच्या रुंदीच्या फेरबदलास मान्यता घेणे आवश्यक आहे. त्याकामी महापालिकेने यापूर्वी शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणेच सदरच्या रस्त्याची रुंदी ९०.०० मी. च्या ऐवजी ७५.०० मी. करण्याची धारणा कायम ठेवुन सदर फेरबदलाचा प्रस्ताव उक्त अधिनियमांच्या कलम ३७ खाली शासनाकडे सादर करण्यास तसेच आकुर्डी वॉर्ड क्र.५२ तुळजाई वस्ती येथील कै.वसंतदादा

पाटील शाळेच्या उत्तरेकडील संगीता हॉटेल ते मुंबई-पुणे हायवे पर्यंतचा रस्ता शाळेच्या कंपाउंड वॉलपासून १२ मीटर रुंदीचा करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

मा.विजया जाधव :- मा.महापौर साहेब, हा विषय माझ्या वॉर्डातील नागरिकांचा आहे. रस्ता वाकडा जातो, त्यामुळे बरीच घरे, मध्यमवर्गीय लोकांची घरे यात जातात. हा रस्ता सरळ जावा म्हणजे कमीत कमी लोकांची घरे जातील.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, हा विषय दुसऱ्यांदा महापालिका सभेपुढे आला आहे. त्रिवेणी नगर मधून ९० मी.चा स्पाईन रोड जातो. त्या वॉर्डात मा.विजया जाधव नगरसदस्या आहेत. ९० मी.चा स्पाईन रोड प्रॅक्टीकली पुढे ९० मी. जायला जागा सापडत नाही. रोडच्या दोन्ही बाजूला प्राधिकरणाच्या स्किम झाल्या आहेत. महानगरपालिकेने ९० मी. ऐवजी ७५ मी. करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. तो पाठवित असताना ७५ मी. चे ६० मी. करावे अशी सूचना आली होती. प्राधिकरणाच्या मंजूर डि.पी.प्रमाणे केलेले मार्कींग व महानगरपालिकेच्या डि.पी. प्रमाणे केलेल मार्कींग दोन्ही वेगवेगळे येतात. आपण या सभागृहात नागरिकांसाठी बसलेलो आहोत. हा आमच्या वॉर्डातील विषय आहे. रस्ता वाकडा जातो आहे तो सरळ करावा. कमीत कमी घरे गेली पाहीजेत. आयुक्त साहेबांनी व्हिजिट करुन सरळ रस्ता करावा. तुम्ही निर्णय द्याल तो मान्य आहे.

मा.मारुती भापकर :- मा.महापौर साहेब, सदर स्पाईन रोड हा महानगरपालिका हद्दीमध्ये हद्दवाढ गावांची प्रारुप विकास योजना अंतर्गत तांत्रिकदृष्ट्या बदल हा महानगरपालिकेच्या विकास आराखड्याप्रमाणे ७५ मी. रुंद न करता पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने शासन मंजूर ७५ मी. रोडच्या केलेल्या मार्किंगप्रमाणे करावे अन्यथा ७५ मीटर ऐवजी ६० मीटर रुंद रोड करावा की ज्यामुळे कमीत कमी मिळकती बाधित होऊन अनेक नागरिकांचे कमीत कमी नुकसान होईल. जनहिताच्या दृष्टीने हा तांत्रिक बदल अत्यंत आवश्यक आहे.

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, अनुमोदन देतो.

मा.शांताराम भालेराव :- मा.महापौर साहेब, हा विषय पूर्वी शासनाकडे ९० मी. चे ७५ मी. करण्यासाठी पाठवला होता. परंतू विकास आराखड्यात ९० मी. करण्यासाठी जेवढे रस्ते आहेत, सर्व रस्ते असल्याप्रमाणे मंजूर होऊन आले. ६० मी. करता आले तर ६० मी. करावे.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा डी.पी. प्लॅन कसा आहे, प्राधिकरणाचा कसा आहे. मॅप कसा आहे याची सविस्तर माहिती श्री.पाटिल यांच्याकडून घ्यावी. नेमका प्रॉब्लेम काय आहे ते प्रशासनाने निदर्शनास आणून द्यावे.

मा.महापौर :- ज्यांच्या वॉर्डातून हा रस्ता जातो, त्या मा.विजया जाधव, मा.सुलभा ऊबाळे, मा.शांताराम भालेकर, मा.दत्तात्रय साने या सर्व जणांनी मिळून जागेवर व्हिजिट देऊन संबंधित अधिकाऱ्यांना घेऊन परिस्थिती बघून जो योग्य वाटेल तो निर्णय उपसूचनेद्वारे आणावा.

मा.दत्तात्रय साने :- मा.महापौर साहेब, श्री.दिलीप बंड आयुक्त असताना जागेवर जाऊन व्हिजिट देऊन आलो होतो. तो रस्ता प्राधिकरणाच्या व मनपाच्या निकषाप्रमाणे मोठा होत नाही. तेथील घरांत राहणाऱ्या लोकांवर अन्याय होतो आहे. कमीत कमी किती घरे जाणार, कुठल्या बाजुने जाणार याची श्री. पाटील यांना माहिती आहे. प्राधिकरणाची घरे वाचवण्यासाठी त्यांनी तो रस्ता आमच्या बाजुने आणला आहे.

मा.महापौर :- मी सहमत आहे. कोणाही सदस्याच्या भावनेशी खेळायचे नाही.

मा.पाटील (उपसंचालक,नगररचना) :- मा.महापौर साहेब, पूर्वी प्रारुप डी.पी. रस्ता मान्य झाला, महापालिका सभेत विषय आणला त्यावेळी चर्चा झाली. रिजनल प्लॅनमध्ये ४०० ते ५०० मी. लांब ९० मी. रस्ता दाखवला आहे. प्राधिकरण क्षेत्रात ७५ मी. विकसित झाला आहे. अर्धे काम राहीले त्याचा प्रस्ताव ठेवला आहे. ९० चे ७५ करताना आपल्या हद्दीत करता येईल. आपल्या डी.पी. प्रमाणे ९० मी.ची आकडेवारी काढली. त्याप्रमाणे ८९ मिळकती बाधित होत आहेत. प्राधिकरणाच्या ७५ मी.च्या प्रस्तावाप्रमाणे ८६ मिळकती बाधित होत आहेत. ७५ मी. प्रमाणेचा महानगरपालिकेचा प्रस्ताव शासनाकडे गेला. त्याप्रमाणे ७० घरे बाधित होतात.

मा.महापौर :- हा विषय सभागृहामध्ये मांडला होता. मुळात डी.पी.प्रमाणे ९० मी. होते. ९० ऐवजी सरसकट ७५ मी. व्हावे असे मा.दिलीप बंड यांचे सुरुवातीपासूनच धोरण होते. रोडच्या बाबतीत शासन कॉम्प्रमाईज करत नाही. आयुक्त व नगररचना ६० मी. सांगू शकणार नाहीत. सरसकट ७५ मी. व्हावे इथपर्यंत ते सांगू शकतील. ६० मी. व्हावे म्हटले तर शासन सुद्धा मान्य करणार नाही. तुम्ही एकत्र बसून निर्णय घ्या. सर्वांना त्याचा उपयोग होईल. कमीत कमी घरे जातील.

मा.विजया जाधव :- मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसुचना मांडते -
संबंधित रस्ता हा कमीत कमी मिळकती जातील व सरळ व्हावा अशी दुरुस्ती करावी.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, उपसुचनेला अनुमोदन देते.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, उपसुचना स्विकारली आहे.

मा.सुलभा ऊबाळे :- मा.महापौर साहेब, तुम्ही व्हिजिट करुन समोरा समोर चर्चा करा.

मा.महापौर :- आत्ता विषय मंजूर करु. डि.पी.ला कसे चॅलेंज करणार. उद्या ९० मी. प्रमाणे घरे पाडली तर कसे होईल. माझ्या अध्यक्षतेखाली कमिटी स्थापन करुन ७५ मी. प्रमाणे रस्ता कसा सरळ होईल, कमीत कमी घरे कशी पडतील ते पाहू.

मा.शांताराम भालेकर :- मा.महापौर साहेब, विषय मंजूर करा.

मा.महापौर :- कमीत कमी मिळकती कशा वाचतील यासाठी व्हिजिट करण्यात येईल.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता -

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक :- ७८१ | विषय क्रमांक :- २२ |
| दिनांक :- २१.१२.२००९ | विभाग :- मा.आयुक्त |

संदर्भ- १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्रमांक क्र.जा.क्र.नरवि/कावि/३क/३७०/२००८ दिनांक २२/१२/२००८
२) मा. अ प्रभाग समितीकडील ठराव क्र.११ दि.१२.६.०९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या गावांसाठी प्रारुप विकास योजना सन २००० मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. मौजे तळवडे या गावाच्या दक्षिणेकडील भागाच्या पूर्व-पश्चिम हद्दीकडे पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरणाची हद्द लागू असुन पूर्वेकडे पेठ क्र.२० व पश्चिमेकडील हद्दीत पेठ क्र.२१ व २२ आहेत. सदर दोन्ही पेठांमध्ये प्राधिकरणाच्या विकास योजनेतील ७५ मी. रस्ता विकसीत होत आलेला आहे. तथापि प्रस्तुत ठिकाणी तळवडे हद्दीत प्रारुप विकास योजनेमध्ये सदर रस्त्याची रुंदी ९० मी. प्रस्तावित केलेली आहे.

सदर रस्त्याचे भूसंपादनाकामी संयुक्त मोजनी झालेली आहे. तेथील रहिवाशांनी सदर सिमांकनास तिव्र विरोध केला आहे. प्रकरणाची वस्तूस्थिती लक्षात घेता प्राधिकरणाकडील हद्दीतील विकसीत होत आलेला ७५.०० मी. रस्त्याच्या रुंदीनुसार रस्ता करणे तांत्रिकदृष्ट्या व तत्वतः संयुक्तिक वाटत असल्याने त्यानुसार प्रकरणी ९०.०० मी. रुंदीच्या ऐवजी ७५.०० मी. रुंद करणेबाबतचा प्रस्ताव मा.महापालिका सभेपुढे सादर करण्यात आला असता त्यास महापालिका सभा ठराव क्र.१७९ दि.२२/१०/०७ व ठराव क्र.२३२ दि.८/१/०८ अन्वये मान्यता दिलेली आहे.

नव्याने समाविष्ट गावांच्या प्रारुप विकास योजनेस शासनाने दि.३०/५/२००८ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम कलम ३० खाली सादर बदलासह भागशः मंजुरी दिलेली असुन त्यानुसार पाणीपुरवठा व जलनिःसारणाशी संबंधित आरक्षणे व विकास योजना रस्त्यांना मंजुरी दिलेली आहे. त्यामुळे सदर तळवडे हद्दीतील ९०.०० मी. रस्ता हा प्रारुप विकास योजनेत प्रस्तावित आहे तसाच मंजुर झालेला आहे. त्यामुळे प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अंतर्गत सदर रस्त्याच्या रुंदीच्या फेरबदलास मान्यता घेणे आवश्यक आहे. त्याकामी महापालिकेने यापूर्वी शासनाकडे सादर केलेल्या प्रस्तावाप्रमाणेच सदरच्या रस्त्याची रुंदी ९०.०० मी. च्या ऐवजी ७५.०० मी. करण्याची धारणा कायम ठेवुन सदर फेरबदलाचा प्रस्ताव संबंधित रस्ता हा कमीत कमी मिळकती जातील व सरळ व्हावा अशी दुरुस्ती करुन त्यासह उक्त अधिनियमांच्या कलम ३७ खाली शासनाकडे सादर करण्यास तसेच आकुर्डी वॉर्ड क्र.५२ तुळजाई वस्ती येथील कै.वसंतदादा पाटील शाळेच्या उत्तरेकडील संगीता हॉटेल ते मुंबई-पुणे हायवे पर्यंतचा रस्ता शाळेच्या कंपाउंड वॉलपासून १२ मीटर रुंदीचा करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७० प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७८२ विषय क्रमांक :- २३
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ-१) क्र.नरवि/कावि/डप्र/१/४५/२००९, दिनांक २०/७/२००९ रोजीचा मा.आयुक्त सो यांचा प्रस्ताव

## २) मा. ड प्रभाग समितीकडील ठराव क्र.९७ दि.७.८.२००९

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन १९९५ साली मंजूर झालेल्या विकास योजनेतील मौजे- पिंपळेसौदागर येथील श्री.अमृता महादू काटे व इतर कुटूंबिय यांच्या मालकीच्या स.नं.२१ मध्ये आ.क्र.३६१ “उद्यान” या प्रयोजनाचे आरक्षण प्रस्तावित केलेले आहे. तसेच १९९९ साली उपरोक्त मंजूर विकास योजनेतून वगळलेल्या भागाची विकास योजना मंजूर करतांना विषयांकित स.नं.२१ या मिळकतीमध्ये आ.क्र.३६१ अ “उद्यान”१८.०० मी. व १२.०० मी. रस्ता ४५.०० मी.रस्ता व ३०.०० मी. एच.सी.एम.टी.आर. हे प्रयोजन प्रस्तावित केलेले आहेत. त्यामुळे सदर शेतकरी भूमिहीन होत आहेत. उपरोक्त आरक्षणापैकी रस्त्यासाठी आरक्षीत असलेली आरक्षणे वगळता येणार नाहीत परंतु सदर शेतकरी संपुर्णपणे भूमिहीन होऊ नये यासाठी आरक्षण क्र.३६१ “उद्यान” व आ.क्र.३६१ अ “उद्यान” यामधील स.नं.२१ मधील भाग वगळून तो निवासी विभागात समाविष्ट करणेकामी म.प्रा.अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये वगळणेबाबत संदर्भ क्र.१ चे मान्य ठरावान्वये मा.महापालिका सभेने मान्यता दिलेली आहे. सदर प्रकरणी महापालिकेच्या मंजूर विकास योजनेनुसार स.नं.२१ पैकी या मिळकतीमधील प्रस्तावित दोन्ही उद्यानाचे आरक्षणाने बाधित होणारे क्षेत्र वगळणेबाबत मा.महापालिका सभेने मान्यता दिलेली आहे. परंतु विषयांकित दोन्ही आरक्षणापैकी आ.क्र.३६१ अ उद्यान यामधील स.नं.२१ पैकी मधील श्री.अमृता महादू काटे यांचे मालकीचे एकूण ४७००.०० चौ.मी.क्षेत्र वगळणेकामी पुढील कार्यवाही करणेबाबत संदर्भ क्र.२ चे टिपणीनुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार पुढील विहीत कार्यवाही पुर्ण करणेच्या अनुषंगाने हितसंबंधीतांच्या सुचना व हरकती मागविणेकामी संदर्भ क्र.३ अन्वये दै.सामनामध्ये दि.२३ जुलै, २००८ रोजी दै.इंडियन एक्स्प्रेस मध्ये दि.२४ जुलै, २००८ रोजी व दै.लोकमत मध्ये दि.  जुलै, २००८ रोजी जाहिर नोटीस प्रसिध्द करणेत आलेली आहे. तसेच संदर्भ क्र.४ अन्वये महाराष्ट्र शासनाचे राजपत्रामध्ये दि.७ ऑगस्ट २००८ रोजी जाहिर नोटीस प्रसिध्द करणेत आलेली होती. सदर प्रसिध्द जाहिर नोटीसच्या अनुषंगाने दाखल हरकतधारकांना अधिनियमातील तरतुदीनुसार दि.२१/३/२००८, दि,.६/५/२००८ रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहणेकामी पत्राद्वारे व उपलब्ध ईमेलद्वारे कळविणेत आले होते. दि.६/५/२००९ रोजी निर्धारित वेळेमध्ये प्रत्यक्ष उपस्थित राहिलेले हरकतधारकांनी लेखी हरकती सादर केलेल्या आहेत. हरकतीस उपस्थित राहू न शकलेल्या हरकतधारकांनी तद्‌नंतर पत्राद्वारे लेखी हरकती इकडील विभागास सादर केलेल्या आहेत. सदर प्रकरणी आ.क्र.३६१ अ “उद्यान” यामधील श्री.अमृता महादू काटे यांचे मालकीचे एकूण ४७००.०० चौ.मी.इतके क्षेत्र आरक्षणामधून वगळून निवासी विभागात समाविष्ठ करणेत हरकत नाही असे वाटते. तरी उक्त प्रस्ताव व नागरीकांच्या प्राप्त

हरकती/सुचनाचे अवलोकन होऊन निर्णय होऊन सदर प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करणेकामी सदर प्रस्तावास मान्यता देणेची शिफारस करणेत आली आहे. त्याप्रमाणे त्यास मान्यता देणेत येत आहे.

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७०    प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.राजेश पिल्ले :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७८३    विषय क्रमांक :- २४
दिनांक :- २१.१२.२००९    विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) क्र.नरवि/कावि/३ब/१/१२४/२००९, दिनांक २०/७/२००९ रोजीचा मा.आयुक्त सो। यांचा प्रस्ताव
२) मा. ड प्रभाग समितीकडील ठराव क्र.९८ दि.७.८.२००९

मौजे-रहाटणी, रहाटणी, थेरगांव वाकड व इतर परिसराचा जलद गतीने विकास होण्याच्या दृष्टीने पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र.टिपीएस-१८९३/१४१२/युडी-१३, दि.२८ नोव्हेंबर, १९९५ अन्वये मंजूर विकास आराखड्यातील तथापि, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्र.पीसीएन १६९७/९३४/प्र.क्र.८९/नवि-२२, मंत्रालय मुंबई दिनांक १५ नोव्हेंबर, १९९७ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजन नियंत्रण कक्षेमध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे. सदर मंजूर विकास योजनेतील व महापालिकेकडे हस्तांतरीत केलेल्या क्षेत्रामधील मौजे-रहाटणी येथील स.नं.४२ पै., ५० पै., ५३ पै., ६९ पै. ते ७१ पै. मध्ये १२.०० मी. रस्ता प्रस्तावित केलेला आहे. सदर प्रस्तावित रस्त्याबाबत नगरभूमापन कार्यालयाकडील इकडील विभागात उपलब्ध असलेल्या १ : ५०० प्रमाणाच्या नकाशावर मंजूर विकास योजनेनुसार स.नं.४२ पै., ५० पै., ५३ पै. या मिळकतीमध्ये प्रस्तावित रस्त्याची आखणी बसविली असता, विषयांकीत रस्त्याच्या दक्षिणेला स.नं.३९ पैकी व ४० पैकी या मिळकतीच्या मधुन असलेल्या प्रस्तावित १२.०० मी. रस्त्याचे आखणीस समोरा समोर येत नाही. तरी प्रकरणी नगरनियोजनाचे व वाहतुकीचे दृष्टीने मंजूर विकास योजनेतील रस्त्याची

आखणी समोरा समोर असणे आवश्यक आहे. तरी विषयांकित प्रकरणी मंजूर विकास योजनेतील प्रमाण व नगरभूमापन कार्यालयाकडील १ : ५०० प्रमाणाचे नकाशे व जागेवरील परिस्थिती यामध्ये बऱ्याच प्रमाणात विसंगती आढळून येत आहे. सदर प्रकरणी प्रत्यक्ष जागेवर मोजणी केलेली आहे. सोबतचे नकाशामध्ये नगरभूमापन कार्यालयाकडील रेकॉर्ड निळ्या रंगाने बसविलेले असून, काळ्या रंगाने स.नं.४२ च्या पुर्व बाजूकडील हद्दीपासून प्रस्तावित १२.०० मी. रस्तारुंदी लाल रंगाने दर्शविलेली आहे. तसेच समोरासमोर येणारी रस्तारुंदी हिरव्या रंगाने बसविण्यात आलेली आहे. या प्रमाणे रस्तारुंदी कायम केल्यास मंजूर विकास योजनेप्रमाणे प्रस्तावित रस्त्याचे आखणीमध्ये बदल होत आहे. तसेच सदर रस्त्यालगत असणाऱ्या आरक्षण क्र.६५० “भाजीमंडई” या प्रयोजनाचे आरक्षणाचे हद्दीमध्ये बदल होणार आहे. उपरोक्त प्रस्तावित १२.०० मी. रस्ता व त्यालगतचे प्रस्तावित आरक्षण क्रमांक ६५० भाजी मंडई यांचे आखणीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम, १९६६ चे कलम ३७[१] अन्वये फेरबदल करणे आवश्यक आहे व परिणामतः मंजूर विकास योजनेतील १२.०० मी. रस्त्याने व आरक्षण क्रमांक ६५० भाजीमंडई या प्रयोजनाने बाधित होणारे क्षेत्रापैकी काही क्षेत्र निवासी विभागात समाविष्ट करणे आवश्यक आहे. सबब सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.प्रशांत शितोळे :- मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक :- ७८४ विषय क्रमांक :- २५
दिनांक :- २१.१२.२००९ विभाग :- मा.आयुक्त

संदर्भ- १) क्र.नरवि/कावि/डप्र/१/५९/२००९, दिनांक ६/८/२००९ रोजीचा मा.आयुक्त सो। यांचा प्रस्ताव
२) मा. ड प्रभाग समितीकडील ठराव क्र.१०० दि.७.८.२००९

मौजे- पिंपळेसौदागर येथील स.नं.६७ व ६८ चे दक्षिण हद्दीवर पुर्व-पश्चिम १८.०० मी. रुंद रस्ता व स.नं.६८ चे पुर्व हद्दीवर १२.०० मी. रुंद रस्ता पुढे

विद्यमान २०.०० मी. रस्त्यास जोडणेत यावा व स.नं.६४ मधून अनधिकृत रेखांकनामधील ६.०० मी. रुंद रस्त्यास उत्तर दिशेस ९.०० मी. प्रमाणे रुंदी दर्शवून विद्यमान २०.०० मी. रस्त्यास जोडणेबाबत व त्यानुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २०५ अन्वये रस्ते घोषित करणेकामी व पुढील कार्यवाही करणेकामी संदर्भिय ठरावान्वये मान्यता दिलेली आहे.

तरी प्रस्तुत प्रकरणी अधिनियमानुसार पुढील कार्यवाही करणेसाठी हितसंबंधीतांच्या / नागरीकांच्या हरकती व सुचना मागविणेकामी दै.सांजवार्तामध्ये दिनांक ३/६/२००९ रोजी जाहिर नोटीस प्रसिध्द करणेत आलेली आहे.

सदर जाहिर नोटीसच्या अनुषंगाने विहीत मुदतीमध्ये कोणतीही सुचना वा हरकत प्राप्त झालेली नाही, सदर प्रकरणी विषयांकित प्रस्तावास अंतिम मान्यता देणेत येत आहे.

मा.तानाजी खाडे :- मा.महापौर साहेब, ठरावाला अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता -

अनुकूल - ७० प्रतिकूल -०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------------------

मा.महापौर :- सर्व सन्मा. सदस्यांनी सभेचे कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी जे सहकार्य केले त्याबद्दल सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

(योगेश मंगलसेन बहल)
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/०१/२०१०
दिनांक :- ०४/०१/२०१०

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.